दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ७ वे अंक -३६ बुधवार दि.१४ ऑक्टोबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 36 Wednesday, Dt.14 October 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# देशात अराजकता पसरवण्याचे आंतरराष्ट्रीय षडयंत्र-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबई : प्रतिनिधी

विदेशी शक्तींच्या मदतीने काँग्रेस आणि इंडिया आघाडीला देशात अराजकता पसरवायची असून हे आंतरराष्ट्रीय षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेला मोर्चा हा भारताच्या इतिहासातील काळा दिवस होता, अशी टीकाही त्यांनी केली.

काँग्रेसच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला होता. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत घेऊन विरोधी पक्षाच्या आंदोलनावर टीकास्त्र सोडले. सोमवारचा दिवस हा देशाच्या इतिहासातील काळा दिवस होता. न्यायालयावर मोर्चा काढणे, आंदोलन करणे हे यापूर्वी इतिहासात कधीही घडले नाही. ही घटना म्हणजे भारताच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेवर हल्ला आणि न्यायव्यवस्थेचा अपमान असल्याचे सांगत शिंदे यांनी याप्रकरणी विरोधकांकडून माफीची मागणी केली.पंतप्रधानांच्या निवासस्थानसमोर आंदोलन असो किंवा सध्या दिल्लीत दररोज सुरु असलेली राजकीय आंदोलने, ही देशासाठी धोकादायक आहेत. अनेक विदेशी शक्ती भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत. चीन बलवान झाला तसे भारताला बलवान होऊ देणार नाही, असे काहीजण म्हणाले होते. हा आंतरराष्ट्रीय कट कारस्थानाचा भाग आहे, असा आरोप शिंदे यांनी केला.विरोधकांना आता निवडणुकांमधून जिंकता येणार नसल्याची खात्री झाली आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर त्यांचा तीनवेळा पराभव झाला असून पराभवाची हॅट्रीक झाली आहे. सत्ता काबीज करता येत नाही तर देशात अशांतता किंवा अराजकता कशी पसरेल, यासाठी ते प्रयत्न करत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम विरोधक करत आहेत अशी टीका उपमुख्यमंत्र्यांनी केली.

विरोधक ईव्हीएम मशीनवर संशय घेतात. निवडणूक आयोगावर हल्ला करतात, मात्र पुरावे देत नाही. याच निवडणूक आयोगाच्या कार्यकाळामध्ये तेलंगणा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू अशी काही राज्य जिंकले, तिथे त्यांनी मत चोरी केली का, असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. विरोधकांनी सरन्यायाधीशांसंदर्भात गंभीर ट्विट केले होते. सरन्यायाधीशांना राजीनामा देण्याबाबत इशारा देण्याची मजल विरोधकांची गेली आहे. ही घातक प्रवृत्ती देशात बळावत असल्याबद्दल एकनाथ शिंदे यांनी चिंता व्यक्त केली.

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहा:मझर खान

### बीड शहरात पप्पू कागदे यांच्या वतीने विराट जाहीर सभा आयोजित

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना

पान ३ वर...

## आ. सतिश चव्हाण विक्रमी मताधिक्यांनी विजयी होतील - अमरसिंह पंडित

### सतीश चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत द्या - आ. विक्रम काळे



गेवराई (प्रतिनिधी)

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण विक्रमी मताधिक्यांनी विजयी होतील त्यात कोणाच्याही मनात शंका ठेवू नका, शिवछत्र परिवाराच्या संदर्भात होत असलेला अपप्रचार आणि संभ्रम दूर करून आ. सतीश चव्हाण यांच्या विजयासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत असे आवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. कार्यकर्त्यांनी गाफील न राहता एक एक मतदान आ. सतीश चव्हाण यांना कसे पडेल यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करावे असे आवाहन आ. विक्रम काळे यांनी केले. मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ पदवीधर संवाद बैठकी मार्गदर्शन करताना ते

पान ३ वर...

## दुष्काळी परिस्थित टॅकर प्रणालीत पार्दशकता आसावी - सौ.गिताभाभी पवार

गेवराई ।प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थिती मध्ये पाणी टॅकर प्रणालीत पार्दशकता आणण्यासाठी जि.पी.एस. व क्युआर कोड प्रणाली बंधनकारक करण्यात यावी तसेच टॅंकर भरतात त्या ठिकाणी सिसिटिव्ही कॅमेरा बसवण्यात यावा तसेच पि.आर.कार्ड वाटपाच्या कामाला गती देण्यात यावी अशी मागणी नगराध्यक्षा सौ.गिताभाभी पवार यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी निवेदनाद्वारे मागणी

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नगर परिषदेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांच्या निमित्ताने नगर परिषदेच्या अध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली नपचे सर्व सभापती, नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने मंगळवार ता. १३ रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन, विविध प्रश्नांवर चर्चा करून, सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. दरम्यान, नपच्या निवेदनाचा विचार करून, सर्व विषयातील विभागांना तातडीने निधी देण्यात



### गेवराई शहराच्या विकास कामासाठी तातडीने निधी द्या - नगराध्यक्षा गीताभाभी पवार

येईल, अशी सकारात्मक भूमिका जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी मांडली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहराच्या विकासाच्या दृष्टीने नगर परिषद विविध विकासकामे व नागरी सुविधा उपलब्ध करून देत आहे. शहराची वाढती लोकसंख्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, नागरी सुविधा व इतर मूलभूत गरजा लक्षात घेता नगर परिषदेस आवश्यक निधी गरजेचा आहे. बीड जिल्हा वार्षिक योजनेचा सन २०२६-२७ अंतर्गत नगर परिषदेस आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येऊन, विकासकामांच्या प्रस्तावांना तातडीने प्रशासकीय मान्यतात द्यावी, शहरातील स्वच्छता व्यवस्था सक्षम व प्रभावी करण्यासाठी

पान ३ वर...

## शेतकऱ्यांनो खचून जाऊ नका ठाकरे शिवसेना पक्ष आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिल - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

### जिल्हा शिवसेनेच्या वतीने मदत केंद्र चालू

बीड प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व मराठवाडा संपर्कनेते तथा शिवसेना नेते, आमदार अंबादास दानवे साहेब व लोकसभा संपर्कप्रमुख अशोकराव सकपाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना व सर्वसामान्य लोकांना मदत व्हावी व अधार मिळावा या उद्देशाने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, अल्पसंख्याकचे जिल्हा अध्यक्ष आयुब भाई पठाण, अल्पसंख्याक महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शेख यासमीन बाजी, यांच्या प्रमुख उपस्थितीत अधार केंद्र उघडण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब




ठाकरे साहेब यांनी आम्हाला ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करण्याचा कानमंत्र दिलेला आहे,पुढे उद्धव साहेब ठाकरे यांनीही हिच शिकवण पूढे अंगीकृत करून हा पक्ष यशस्वी पुढे घेऊन चालत आहेत त्यांच्या आदेशानुसारच बीड जिल्हात प्रचंड दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे,

पान ३ वर...

## मुख्य निवडणूक आयुक्तांना हटविण्याच्या मागणीसाठी दिल्लीत इंडिया आघाडीचे आंदोलन

### आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह लातूर जिल्हा व शहर कॉंग्रेस कमिटीचा सहभाग

नवी दिल्ली / लातूर प्रतिनिधी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीच्या वतीने दिल्लीत जनआंदोलन करण्यात आले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले. माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत लातूर जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनीही आंदोलनात सहभाग घेतला.

लोकशाही मूल्ये, संविधान आणि स्वायत्त संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. हा संघर्ष देशभर व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. लोकशाही व जनतेचे




हक्क जपण्यासाठीचा लढा सुरूच राहील, असे आमदार अमित देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री व गटनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री माणिकराव ठाकरे, माजी मंत्री नितीन राऊत, कुणाल राऊत, नसीम खान, भाई जगताप, अतुल लोंढे, भानुदास माळी, उमेशराजे निंबाळकर, रविराज देशमुख, ऋषिकेश पाटील, अनिल पटेल, अनिरुद्ध बनकर, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. शिवाजी जवळगेकर, लातूर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष निलेश देशमुख, लातूर शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष विष्णुदास धायगुडे आणि लातूर जिल्हा काँग्रेस सोशल मीडिया विभागाचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ऊस उत्पादकांचा चक्काजाम ; दर व थकीत देयकांवरून आंदोलन तीव्र



### गंगामाऊली शुगरचा ३ हजारांचा दर अमान्य; बैठक घेऊन दर निश्चित करण्याची मागणी

केज/प्रतिनिधी

गतवर्षीची थकीत ऊस बिले अदा करावीत, चालू हंगामाचा योग्य ऊसदर जाहीर करावा आणि प्रलंबित देयके तातडीने द्यावीत,या मागण्यांसाठी मांजरा पट्ट्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मंगळवार दि.१३ आक्टोबर रोजी धनेगाव फाटा येथे चक्काजाम आंदोलन केले.यावेळी मागण्यांवर तातडीने तोडगा न निघाल्यास आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी घेतली.आंदोलना दरम्यान येडेश्वरी साखर कारखान्याने येत्या दोन दिवसांत प्रतिटन २०० रुपये, गंगामाऊली शुगरने उर्वरित देय रक्कम,तर अंबासाखर कारखान्याने बोलल्या प्रमाणे उर्वरित १५० रुपये अदा करावेत अशी मागणी करण्यात आली.तसेच चालू हंगामाचा ऊसदर जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली.दरम्यान, गंगामाऊली शुगरकडून प्रतिटन ३ हजार रुपये ऊसदर जाहीर करण्यात आला असून हा दर शेतकरी प्रतिनिधींना मान्य नसल्याची भूमिका आंदोलनात मांडण्यात आली.शेतकरी प्रतिनिधी आणि कारखाना व्यवस्थापन यांची लवकरात लवकर बैठक घेऊन

पान ३ वर...

## संपादकीय....

# उद्याला घाबरू नका कारण..

बीड - आयुष्याच्या प्रवासात काही रस्ते असे असतात, ज्यावरून चालताना पायांपेक्षा मन जास्त जखमी होतं. काही दिवस अशा आठवणी देऊन जातात, ज्या विसरायच्या असतात,काही माणसं अशा जखमा देऊन जातात, ज्या दिसत नाहीत पण आयुष्यभर जाणवत राहतात. काही अपयशं आपला आत्मविश्वास हिरावून घेतात, तर काही परिस्थिती आपल्याला स्वतःच्याचं सामर्थ्यावर प्रश्न विचारायला भाग पाडतात.पण एक गोष्ट लक्षात ठेवा, मित्रांनो..गेलेला काळ आपली शिक्षा नसतो, तर तो आपल्या उद्याची तयारी असतो.काल कितीही कठीण असला, कितीही वेदनादायी असला, तरी तो आता इतिहास आहे. त्याला बदलता येणार नाही, पण त्यातून शिकून स्वतःला बदलता नक्की येतं. म्हणूनच भूतकाळाच्या राखेत बसून वर्तमान जाळण्यापेक्षा, त्याच राखेतून नव्या स्वप्नांचा अंकुर उगवणं अधिक शहाणपणाचं आहे.आयुष्यात आलेल्या संकटांनी जर तुम्हाला तोडलं असेल, तर स्वतःला दोष देऊ नका. कारण तुटलेली माणसंही पुन्हा उभी राहू शकतात,फक्त त्यांना स्वतःवरचा विश्वास पुन्हा जागवावा लागतो.कधी कधी आयुष्य आपल्याला अशा वळणावर आणून उभं करतं, जिथे पुढचा रस्ता दिसत नाही. अंधार इतका दाट असतो की पहाटेची कल्पनाही अशक्य वाटते. पण लक्षात ठेवा..अंधार हा प्रकाशाचा शेवट नसतो, तर तो प्रकाश येण्यापूर्वीचा काळ असतो.म्हणून उद्याची चिंता करून आजचा श्वास वाया घालवू नका..

उद्याला काय होईल, कोण भेटेल, कोण साथ सोडेल, कोणती संधी मिळेल, कोणतं संकट उभं राहील हे आपल्या हातात नसतं. पण उद्याला सामोरं जाण्याची आपली मानसिक तयारी आपल्या हातात असते.कालने जर तुम्हाला शिकवलं असेल की प्रत्येकजण आपला नसतो, तर उद्या योग्य माणसांची किंमत ओळखा..कालने जर अपयश दिलं असेल, तर उद्या अनुभवाच्या ताकदीने पुन्हा प्रयत्न करा..कालने जर विश्वासघात दिला असेल, तर उद्या कटु होऊ नका फक्त अधिक शहाणे व्हा..कालने जर तुम्हाला रडवलं असेल, तर उद्या त्या अश्रूंना तुमच्या जिद्दीचं पाणी बनवा..आणि कालने जर तुम्हाला एकटं केलं असेल, तर उद्या स्वतःचीच सर्वात मजबूत सोबत बना.कारण आयुष्यातील सर्वात मोठी ताकद बाहेरून मिळत नाही, तर ती आपल्या आत जन्माला येते.आपण अनेकदा भविष्याची भीती बाळगतो, कारण आपल्याला वाटतं..पुन्हा काही वाईट घडलं तर ? पण स्वतःला एकदा विचारा यापूर्वी मी किती काही सहन केलं आहे, तरीही आज मी उभा आहे मग उद्याची भीती कशाला ?तुम्ही ज्या संकटातून वाचलात, त्याने तुम्हाला कमजोर नाही तर अधिक कणखर केलं आहे. ज्या अश्रूंनी तुमचे डोळे भरले, त्यांनी तुमची दृष्टी अधिक स्पष्ट केली आहे. ज्या अपयशांनी तुमची पावलं थांबवली, त्यांनीच तुम्हाला पुढच्या वाटेची दिशा दाखवली आहे..



केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील हादगाव येथे,दि.९ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी, शिक्षकांमध्ये विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी,या उद्देशाने चिंचोली माळी केंद्राची तिसरी शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हादगाव येथे दि.९ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी पत्रकार ज्योतीराम सावंत हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंचोली माळी केंद्रसमन्वयक संतोष नखाते सर उपस्थित होते.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पप्पन राजे वायबसे आणि उपाध्यक्ष मनोज यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.शिक्षण परिषदेत प्रास्ताविक,मागील महिन्यातील शैक्षणिक कामकाजाचा आढावा, लोकसहभाग आणि विचारांची देवाणघेवाण याविषयांवर केंद्रप्रमुख संतोष नखाते सर यांनी केंद्रांतर्गत येणाऱ्या विविध शाळांतील शिक्षकांना मार्गदर्शन केले. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे आणि शाळांच्या विकासात लोकसहभाग वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हदगाव येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुरेल स्वागत गीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला प्रसन्न वातावरण लाभले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री.चव्हाण सर,सह शिक्षिका सौ.शामल नाईकवाडे मॅडम आणि श्री.जाधव सर यांनी शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम पार पाडला.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८४६/२०२६**
**रामलिला भ्र. अशोक शिंदे व इतर वि. निरंक**
**मार्फत ॲड एस. ए. दिंडे, गेवराई)**

अर्जदार -
१. रामलीला भ्र. अशोक शिंदे वय ६० वर्षे, धंदा शेती
रा. गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड
२. गयाबाई भ्र. नारायण नवले वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर
३. अनुसया भ्र. बाबासाहेब नरवडे वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. दहिपुरी ता. अंबड जि. जालना

ज्याअर्थी मयत नारायण पि. तुळशिराम नवले हे/हया अनुक्रमे दिनांक १८/०४/२०२३ रोजी मौजे गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नारायण पि. तुळशिराम नवले, रा. गोविंदवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीखः २०/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८५१/२०२६**
**अजय लक्ष्मण राऊत व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. एच.एस. पाटील)**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण पि. उमाजी राऊत, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २८/०५/२०२५ रोजी युनायटेड सिग्मा हॉस्पीटल छ. संभाजीनगर, ता.जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ अजय लक्ष्मण राऊत, वय २१ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ इंदुबाई भ्र. लक्ष्मण राऊत, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ मनिषा भ्र. रमेश काळे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. नाळवंडी ता.जि.बीड, अर्जदार क्र. ४ प्रतिक्षा भ्र. कैलास गवळी, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. खालापुरी ता.जि.बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लक्ष्मण उमाजी राऊत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
पुढील तारीख - २७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८७३/२०२६**
**कल्पना भ्र. गणेश शेंबडे व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. जी.एस. डोईफोडे)**

ज्याअर्थी मयत नामे गणेश उत्तम शेंबडे, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ०८/११/२०२३ रोजी शेकटा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ कल्पना भ्र. गणेश शेंबडे, वय ३१ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड ह.मु. पिंपरीशहाली ता. नेवासा जि. अहिल्यानगर, अर्जदार क्र. २ सागर पि. गणेश शेंबडे, वय ८ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र. १ कल्पना भ्र. गणेश शेंबडे, वय ३१, धंदा शेती व घरकाम, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड ह.मु. पिंपरीशहाली ता. नेवासा जि. अहिल्यानगर, अर्जदार क्र. ३ समर्थ पि. गणेश शेंबडे, वय ४ वर्षे, अपाक आई अर्जदार क्र. १ कल्पना भ्र. गणेश शेंबडे, वय ३१, धंदा शेती व घरकाम, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड ह.मु. पिंपरीशहाली ता. नेवासा जि. अहिल्यानगर, गैरअर्जदार क्र. १ उत्तम पि. धोंडीबा शेंबडे, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. २ चंद्रकला भ्र. उत्तम शेंबडे, वय ५३ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. शेकटा ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गणेश उत्तम शेंबडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
पुढील तारीख - २७/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**मा. श्री.एच.एम.मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३६/२०२६**
**रामेश्वर बालु कऱ्हे वि.ग्रामपंचायत कार्यालय बंगाली पिंपळा**
(मार्फत ॲड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रामेश्वर बालु कऱ्हे, वय-२६ वर्षे, रा.बंगाली पिंपळा ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, बंगाली पिंपळा ता.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराची मुलगी नामे प्रांजल रामेश्वर कऱ्हे रा.टकलेवाडी ता.गेवराई जि.बीड दिनांक २९/०५/ २०२४** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक -/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४१७/२०२६**
**सुरज वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मालेगांव बु.**
**(मार्फत - ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुरज सुभाष गोरे वय-३४ वर्षे, रा.मालेगांव बु. ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची स्वतःची दिनांक १०/०५/१९९२ रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१०/ २०२६.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**जाहिरनामा**
**दिवाणी किरकोळ अर्ज १५२१/२०२६**
**गजराबाई वासुदेव मस्कर वि. निरंक**
**विधीज्ञ टेकाडे वाय. एस.**
**मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**
**अर्जदार**
**१. गजराबाई भ्र. वासुदेव मस्कर, वयः ७७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जेबा पिंपरी, ता.जि. बीड.**
**२. शिवाजी पि. वासुदेव मस्कर, वय ४९ वर्षे, धंदा-शेती, रा. जेबा पिंपरी, ता.जि.बीड ह.मु. नारायण नगर आंबेगाव बु. आंबेगाव पठार पुणे.**
**३. रत्नमाला भ्र.भारत चौधरी, वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. जेबा पिंपरी, ता.जि. बीड.**
**४. लता भ्र.प्रकाश केसकर, वय : ५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा.दत्तप्रसाद सोसायटी, गणेश नगर, पुणे सिटी पुणे.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे वासुदेव दादाराव मस्कर यांचा मृत्यु दिनांक १७/०४/२०२५ रोजी जेबा पिंपरी, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार नं. २ हा मुलगा आहे व अर्जदार कं. ३ ते ४ या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील फार वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे वासुदेव दादाराव मस्कर यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरह मयत नामे वासुदेव दादाराव मस्कर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २१.१०.२०२६ आहे.
आज दिनांक १५.०९.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८४५/२०२६**
**पारुबाई भ्र. साहेबराव भिताडे व इतर वि. निरंक**
**(मार्फत - ॲड. जी.एस. डोईफोडे)**

ज्याअर्थी मयत नामे साहेबराव तबाजी भिताडे, रा. गंगावाडी ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २६/१२/२०२५ रोजी गंगावाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ पारुबाई भ्र. साहेबराव भिताडे, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. गंगावाडी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ राजेंद्र पि. साहेबराव भिताडे, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. गंगावाडी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ रविंद्र पि. साहेबराव भिताडे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. गंगावाडी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ४ जालींदर पि. साहेबराव भिताडे, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. गंगावाडी ता. गेवराई जि.बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत साहेबराव तबाजी भिताडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
पुढील तारीख - २६/११/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८७८ दि.१८.०८.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रहेमानखान लालखॉ पठाण रा.धाकलगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नुशरत नदीमखाँ पठाण | नात | ०७.१०.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४०९/२०२६**
**करीमा तस्लीम शेख वि.ग्रामपंचायत कार्यालय महांडुळा**
(मार्फत ॲड एस.एस.ढोबळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **करीमा तस्लीम शेख वय-४६ वर्षे, रा.महांडुळा, ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, महांडुळा ता.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराची मुलगी नामे उजमा तस्लीम शेख, रा.महांडुळा ता.गेवराई जि.बीड दिनांक २८/०४/ २००९** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १७/१०/२०२६.

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

---

**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३५/२०२६**
**करीम तस्लीम शेख वि.ग्रामपंचायत कार्यालय कोळगांव**
(मार्फत ॲड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **कृष्णा जालिंदर चव्हाण, वय-२७ वर्षे, रा.गाडेवाडी ता.कोळगांव जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, कोळगांव ता.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराची मुलगा नामे इंद्रजीत कृष्णा चव्हाण, रा.गाडेवाडी ता.गेवराई जि.बीड दिनांक १८/११/ २०२३** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

---

**मा. श्री.एच.एम.मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३८/२०२६**
**सखु दत्ता भिसे वि.ग्रामपंचायत कार्यालय खेर्डावाडी**
(मार्फत ॲड आर.ए.कोळेकर)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सखु भ्र.दत्ता भिसे, रा.खेर्डावाडी ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, खेर्डावाडी ता.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराचे पती नामे दत्ता उत्तम भिसे , रा.टकलेवाडी ता.गेवराई जि.बीड दिनांक १०/१२/ २०१७** रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १०/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २७/१०/२०२६.

**क. लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन**
**सहा. अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, गेवराई.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि- दि.-.-.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख शाकेर सिराज रा.एकलहेरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जैनब शाकेर शेख | मुलगी | २५.०४.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि- १२४० दि.२९.०९.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अनिल रामेश्वर सावंत, रा.हस्तपोखरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा अनिल सावंत | मुलगा | ०९.०१.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि- ११३१ दि.१९.०८.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रकाश प्रल्हाद वाघमारे, रा.हिरडपुरी ता.पैठण** यांनी यांच्या **भाची**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनुश्री गोकुळ सातपुते | भाची | १४.०८.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि- ९८८ दि.-.-.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **यासेब मुक्तार तांबोळी, रा.साष्ट पिंपळगांव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या भाचा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अलि वसीम सय्यद | भाचा | ११.०४.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# तळागाळातील विद्यार्थ्यांना घडवा, गुणवत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर चमकण्याची संधी निर्माण करा - जयदत्त क्षीरसागर

शिरूर कासार (प्रतिनिधी)

शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तेला जागतिक स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन चालणार नाही, तर संशोधन, सांस्कृतिक क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांना प्राविण्य मिळविण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी खा.स्व.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मृतिदालनाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती सतीश काटे, सुधाकर मिसाळ, बाबुराव केदार, सुभाष क्षीरसागर, शरद ढाकणे, गहिनीनाथ पाखरे, सुलेमान पठाण, गोविंद पाटील गाडेकर, कलंदर पठाण, आजिनाथ गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले की, आपल्या काळात शैक्षणिक वातावरण आजच्या तुलनेत फारसे प्रभावी आणि परिणामकारक नव्हते. मात्र, अलीकडच्या काळात शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवून ज्ञान, कौशल्य आणि गुणवत्तेच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली पाहिजे. संधी निर्माण करण्याची ताकद गुणवत्तेत असते. केवळ इतरांच्या आधारावर प्रगती करता येत नाही; स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये



विकसित झाली पाहिजे. शासनाने निर्माण केलेल्या विकासाच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रासमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलांकडे केवळ आव्हान म्हणून न पाहता त्यांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांची ज्ञानक्षमता आणि संशोधनवृत्ती विकसित केली पाहिजे. देशाच्या प्रगतीत पारंपरिक १०+२+३+२ शैक्षणिक रचनेचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणातून होत असलेले बदलही भावी पिढीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. या परिवर्तनातून देशाच्या शैक्षणिक भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग तसेच आविष्कार' संशोधन उपक्रमांतर्गत विविध स्तरांवर प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, मुख्याध्यापक केशव भांगे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# लातूर येथे महिला किसान दिवसनिमित्त १५ ऑक्टोबरला जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

## महिला शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

लातूर (जिमाका)

संयुक्त राष्ट्रांनी सन २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांचे कृषी, अन्नसुरक्षा, ग्रामीण उपजीविका आणि शाश्वत विकासातील अमूल्य योगदान अधोरेखित करणे, तसेच त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण करण्याच्या मुख्य उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १५ ऑक्टोबर हा दिवस 'महिला किसान दिवस' म्हणून साजरा केला जात आहे.

त्याच अनुषंगाने लातूर येथील कृषी विज्ञान केंद्र येथे जिल्हास्तरावर गुरुवारी, १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'महिला किसान दिवस - २०२६' निमित्त एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत महिला शेतकऱ्यांनी स्वतः विकसित केलेले किंवा स्वीकारलेले स्थानिक कृषी तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण शेती पद्धती, आधुनिक कृषी अवजारे, जैविक निविष्ठा, फेरोमेन ट्रॅप्स (कामगंध सापळे), आणि हवामान बदलास अनुकूल असणारे विविध तंत्रज्ञान यांचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील तालुक्यातील प्रगतशील महिला शेतकऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा गुणगौरवही केला जाणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला शेतकरी, शेतकरी गटांमधील महिला सदस्य आणि प्रगतशील महिला शेतकऱ्यांनी या जिल्हास्तरीय कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यशाळा व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'आत्मा' प्रकल्पाच्या संचालक मनिषा उ. बांगर यांनी केले.

# महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्यात महिला स्टार्टअप हब

## महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि उदैती फाउंडेशनमध्ये सामंजस्य करार

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील महिलांना उद्योग उभारणीसाठी वित्तपुरवठा, बाजारपेठ, मार्गदर्शन आणि व्यावसायिक सहाय्य मिळावे, यासाठी महिला स्टार्टअप हब स्थापन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि उदैती फाउंडेशन यांच्यात यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील आणि उदैती फाउंडेशनच्या संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा शर्मा गोयल यांनी करारावर स्वाक्षरी केली.

या हबच्या माध्यमातून महिला उद्योजकांसाठी मार्गदर्शन, वित्तपुरवठा, बाजारपेठेशी जोडणी आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजनांशी समन्वय साधला जाणार आहे. महिला-नेतृत्वाखालील उद्योगांसाठी विशेष विकास प्रारूप तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

राज्यातील महिला उद्योजकतेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महिला स्टार्टअप निर्देशांक विकसित करण्यात येणार आहे. तसेच विभाग व जिल्हानिहाय आकडेवारीच्या आधारे कामगिरीचे निरीक्षण करण्यासाठी प्रशासकीय माहितीफलक विकसित केला जाईल. समन्वयासाठी आंतरविभागीय संचालन समिती स्थापन करण्यासही मदत होणार आहे.पूजा शर्मा गोयल यांनी या करारामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि महिला नेतृत्वाला प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. उदैती फाउंडेशन महिला रोजगार, उद्योजकता आणि उद्योगक्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी कार्यरत आहे.

# आरोग्यसेवेतील नवोन्मेषासाठी राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब'

## मुख्यमंत्री फडणवीस यांची संकल्पना

### स्थानिक गरजांवर आधारित उपायांची चाचणी,गुणवत्ता, कौशल्य आणि रोजगारनिर्मितीवर भर

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्रात सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाद्वारे आरोग्यसेवेचा दर्जा सुधारणे, नव्या उपायांची चाचणी करणे आणि कौशल्य विकासासह रोजगाराच्या संधी निर्माण करणे यावर भर दिला जाणार आहे.

या व्यासपीठावर शासन, आरोग्यसेवा पुरवठादार, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, नवोन्मेषक आणि विकास भागीदार एकत्र काम करतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य, माहिती विश्लेषण आणि व्यक्तिनिष्ठ आरोग्यसेवा तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक गरजांनुसार व्यवहार्य व परवडणारे उपाय विकसित केले जातील.

दुर्गम भागांतील आणि आरोग्यसेवेपासून वंचित नागरिकांपर्यंत नवोन्मेष पोहोचविणे, यशस्वी उपायांचा विस्तार करणे आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

प्रसूती व स्त्रीरोग संघटनांच्या महासंघाचा 'मान्यता' उपक्रम हे याचे प्रारंभिक उदाहरण आहे. 'एमएसडी फॉर मदर्स' या उपक्रमाच्या समन्वयातून विविध भागीदारांना एकत्र आणून आरोग्यसेवेतील गुणवत्ता आणि शाश्वत सुधारणा साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# बीड जिल्हा न्यायालय येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

बीड (प्रतिनिधी)

आनंद ऋषिजी नेत्रालय, बीड शाखा यांच्या तर्फे बीड येथील वकील महासंघ व जिल्हा न्यायालयातील सर्व कर्मचारी यांच्यासाठी दिनांक १४ व १५ ऑक्टोबर, सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये उपलब्ध तपासण्या: नजर तपासणी, संगणकाद्वारे चष्म्याच्या नंबरची तपासणी, मोतीबिंदू तपासणी, आवश्यक नेत्र तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या शिबिरामध्ये डॉ. रजनी मोटे नेत्रतज्ज्ञ, तसेच ऑप्टोमेट्रिस्ट श्रीमती गीता पवार आणि ऑप्टोमेट्रिस्ट अभिषेक जेजुरकर उपस्थित राहून नेत्र तपासणी करतील. ज्यांना नेत्रविषयक काही समस्या आहेत, तसेच मधुमेह (ऊळरलशींशी) किंवा उच्च रक्तदाब (कूर्शिींशपीळेप) आहे, अशा सर्वांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा.शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे.

नाव नोंदणी करण्यासाठी बीड येथील वकील संघाकडे आपले नाव नोंदवावे.शिबिराच्या अधिक माहितीसाठी संपर्क: आनंद ऋषिजी नेत्रालय, बीड शाखा मो. ९०२१८६९६०२आपल्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी या मोफत नेत्र तपासणी शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन ड आर बी भंडारी,ड विपुल आर भंडारी यांनी केले आहे.

# माजलगावमध्ये 'सेवा संकल्प अभियाना'ला उदंड प्रतिसाद

## एकाच दिवसात अनेक नागरिकांना शासकीय योजनांचा थेट लाभ

बीड (जिमाका)

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत माजलगाव तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'ला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसील कार्यालय माजलगाव येथे या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या एकाच दिवसात विविध शासकीय सेवांचा आणि दाखल्यांचा लाभ तळागाळातील अनेक लाभार्थ्यांना थेट जागेवरच देण्यात आला असून, या शिबिराचा सविस्तर अहवाल माजलगावचे तहसीलदार यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ सादर केला आहे.

राज्यामध्ये १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत असून, याअंतर्गत प्रत्येक तालुक्यात महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल विभागामार्फत एकूण २२ प्रकारच्या सेवा नागरिकांना देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर माजलगावमध्ये हे शिबीर यशस्वीपणे पार पडले.या शिबिरातून सर्वसामान्यांची अनेक प्रलंबित कामे मार्गी लागली आहेत. प्राप्त अहवालानुसार, इतर खात्यांच्या विशेष सहाय्य योजनांची अंमलबजावणी करत सर्वाधिक ११३ लाभार्थ्यांना याचा फायदा मिळवून देण्यात आला. तसेच, महसुली कामकाजात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या सातबारा आणि ८-अ च्या तब्बल २४ नोंदी तत्परतेने अद्ययावत करण्यात आल्या. नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या शिधापत्रिकांचे (रेशन कार्ड) २० पात्र



लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले, तर १२ जणांना नॉन-क्रीमिलेयर प्रमाणपत्रे देण्यात आली. याव्यतिरिक्त प्रलंबित असलेल्या ७ फेरफार नोंदीचा निपटारा करण्यातही प्रशासनाला यश आले आहे.नागरिकांच्या सुविधेसाठी या शिबिरामध्ये ९ जणांना आधार कार्डची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यासोबतच २ महिला शेतकऱ्यांना विशेष प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली. एका लाभार्थ्याला ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र देण्यात आले असून, एकंदर प्रशासनाने विविध आघाड्यांवर नागरिकांचे प्रश्न एकाच छताखाली सोडवले आहेत. सर्वसामान्यांना शासकीय कार्यालयांत खेटे मारावे लागू नयेत आणि त्यांना एकाच ठिकाणी तत्परतेने महसुली सेवा मिळावी, या उद्देशाने राबविण्यात आलेले हे शिबीर माजलगावमधील नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक ठरले आहे.

# गॅलक्सी पॉलिक्लिनिक च्या मोफत आरोग्य तपासणी शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. सय्यद सोहेल यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

बीड (प्रतिनिधी)

सर्वसामान्यांचे आरोग्य निरोगी राहावे आणि वेळेवर योग्य उपचार मिळावेत या सामाजिक उद्देशातून बालेपीर भागातील नगर रोडवर गॅलक्सी पॉलिक्लिनिक पोलीस पेट्रोल पंपासमोर, एफ.एम. जिम खाली येथे दिनांक ११ ऑक्टोबर रविवार रोजी आयोजित मोफत सामान्य आरोग्य तपासणी व आरोग्य शिबिराला रुग्णांचा व नागरिकांचा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये डॉ. सय्यद सोहेल एम.डी. फिजीशियन यांनी उपस्थित शेकडो रुग्णांची आस्थेने व सखोल तपासणी करून त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन करत तपासणी केली. या शिबीरात



रुग्णांची सामान्य आरोग्य तपासणी, उच्च रक्तदाब आणि रँडम ब्लड शुगर चाचणी करण्यात आली. याशिवाय आवश्यकतेनुसार रुग्णांची ई.सी.जी. चाचणी, लिपिड प्रोफाईल टेस्ट (रक्तातील चरबीचे प्रमाण) व किडनी/लिव्हरची तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली. तसेच सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, अशक्तपणा यावरील टॉनिक व इतर सर्व आवश्यक औषधींचे रुग्णांना मोफत वाटप करण्यात आले.

तुमचे आरोग्य आमची पहिली प्राथमिकता हे ब्रीद समोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरामुळे परिसरातील शेकडो सर्वसामान्य व गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. नागरिकांनी डॉ. सय्यद सोहेल आणि गॅलक्सी पॉलिक्लिनिकच्या टीमचे मनःपूर्वक आभार मानले.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांनो खचून जाऊ....

जनावरांना चारा व पिण्याच्या पाण्याची दाहकता तीव्र झाली आहे, शेतकरी व सर्वसामान्य माणूस प्रचंड ताणतणावत वावरत आहे या सर्व बाबींचा विचार करून बीड जिल्हातील शेतकरयांना व गोरगरीब लोकांना अधार मिळावा व यातून आत्महत्यासारखे प्रकार थांबविण्यासाठी आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मदत केंद्र सुरु करण्यात आले असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या अधार केंद्रात येऊन आपल्या समस्याचे निवारण करून घ्यावे व न खचता दुष्काळाशी सामना करावा असे भावनिक आवाहन गणेश वरेकर यांनी केले. या अधार केंद्राचे सर्वसामान्य जनतेतून कौतुक होत असुन हा स्तुत्य उपक्रम आहे असे बोलले जात आहे.या कार्यक्रमाला युवासेना तालुकाप्रमख बारीकराव येवले ,तालुका सचिव नंदुभाऊ येवले, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके , बाळासाहेब मोरे , उपशहरप्रमुख हनुमान गुजर,विनोद गुंड पाटील , विकास गवते, सुनिल इंगळे , ज्ञानेश्वर सिंघन,गजू शिंदे, सिताराम काजळे , बाबु कुटे, रावसाहेब दादा कुटे यांच्यासहित पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ऊस उत्पादकांचा ....

उत्पादन खर्च व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन ऊसदर निश्चित करावा,अशी मागणी करण्यात आली.येत्या दोन दिवसांत प्रलंबित देयके अदा करून ऊस दराच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन पुढेही सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर तोड बंद आंदोलन करण्याचा पर्याय स्वीकारण्यात येईल,अशी भूमिका शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केली.तसेच सर्व देयके अदा होईपर्यंत आणि ऊसदराचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत कारखान्यांचे गाळप सुरू करण्यास विरोध करण्याची भूमिका घेण्यात आली.या आंदोलनास माजलगाव येथील शेतकरी नेते जगदीश काका फरताडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे,शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे,तसेच अरविंद मोरे,मनोराम पवार,सतीश भाऊ शिंदे यांच्यासह परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मांजरा पट्ट्यातील ऊस उत्पादकांच्या मागण्यां बाबत संबंधित साखर कारखाने,शेतकरी प्रतिनिधी आणि प्रशासन यांनी चर्चा करून लवकरात लवकर तोडगा काढावा,अशी मागणी यावेळी

पान १ वरून...

करण्यात आली.दुष्काळी परिस्थित....

स्वच्छता विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. या कामांना आवश्यक मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा, २०२३-२०२४ मध्ये नगर परिषदेमार्फत पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात आलेल्या टँकरच्या बिलांची रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही, सदरील प्रलंबित बिलांची रक्कम उपलब्ध करून देण्यात यावी.नगर परिषदेमार्फत शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यात येतो. पाणीसाठा मर्यादित असल्याने क्षमतेपेक्षा जास्त टँकर ग्रामीण भागासाठी उपलब्ध करून दिल्यास शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊन पाणीटंचाईस सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे, ग्रामीण भागासाठी टँकर उपलब्ध करून देताना नगर परिषदेच्या पाणीपुरवठ्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, याची काळजी करावी.

टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना पारदर्शकता राहावी व गैरव्यवहारास आळा बसावा यासाठी सर्व अधिकृत टँकरवर ऋझड ट्रॅकिंग व ठठ कोड प्रणाली बंधनकारक करण्यात यावी, पाणी केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. नागरिकांच्या मालमत्तेच्या नोंदी अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने पी.आर.कार्ड आवश्यक आहे. गेवराई शहरातील मिळकतींचे तात्काळ सर्वेक्षण करून मोजणी व भूमिअभिलेखाची कार्यवाही पूर्ण करावी व पी.आर.कार्ड तयार करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी उपाध्यक्ष रेवती भगवान घुंबार्डे, गट नेते राजेंद्र राक्षसभूवनकर, नपचे सर्व विभागाचे सभापती, नगरसेविका नगरसेवक उपस्थित होते.

### आ. सतिश चव्हाण...

बोलत होते. मतदारांनी बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सतीश भानुदास चव्हाण यांच्या प्रचारार्थ गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात पदवीधर संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि शिक्षक आ. विक्रम काळे यांनी पदवीधर मतदारांशी संवाद साधत आ सतीश चव्हाण यांना विजयी करण्याचे आवाहन केले. या बैठकीस राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष

पान १ वरून...

भाऊसाहेब नाटकर, रिपाइंचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अर्जुन बारगजे, शिक्षक संघटनेचे रवींद्र खोड, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदीप औटी, उपसभापती श्रीहरी पवार, माजी उपनगराध्यक्ष महेश दाभाडे, नगरपालिकेचे गटनेते खाजा शेख , कोचिंग क्लासेस संघटनेचे शिवाजी वराट यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, पदवीधर, शिक्षक, प्राध्यापक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांनी केले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघटनेचे विष्णू खेत्रे, कोचिंग क्लासेस संघटनेचे शिवाजी वराट आणि सरपंच संघटनेचे कालिदास नवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्राचार्या डॉ. रजनी शिखरे यांनी मानले. पदवीधर संवाद बैठकीला मतदारांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### केंद्रीय मंत्री रामदास ....

करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे मराठवाडा उपाध्यक्ष मझर खान, राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

## कृषी कर्जवाटप आणि आर्थिक समावेशन मोहिमेला गती देण्याचे निर्देश

रायगड-अलिबाग (जिमाका)
रायगड जिल्ह्यातील बँकांच्या कामकाजाचा, विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा तसेच कृषी कर्जवाटपाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची (ऊङउउ) आणि जिल्हास्तरीय आढावा समितीची (ऊङठउ) बैठक जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. कृषी कर्जवाटप आणि आर्थिक समावेशन मोहिमेला गती देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस बँक ऑफ इंडियाचे उपविभागीय व्यवस्थापक भरत सहाय, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक प्रदीप आपसुंडे, जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त गुरूशांत हरळया, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रियदर्शिनी मोरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त जलील अहमद, ठडएढख चे संचालक सुमित धनोरकर तसेच अग्रणी जिल्हा व्यवस्थापक सुधीर गायकवाड यांच्यासह विविध बँकांचे जिल्हा समन्वयक, शासकीय विभागांचे अधिकारी आणि बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील बँकांच्या कामगिरीचा विविध महत्त्वपूर्ण निकषांवर सविस्तर आढावा घेतला. यामध्ये पीक कर्जवाटप, वार्षिक पत आराखड्याची उद्दिष्टपूर्ती, किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्जवाटप तसेच विविध शासकीय योजनांमधील प्रलंबित प्रकरणांचा समावेश होता.

कृषी कर्जवाटपाला गती देण्याचे निर्देश

शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे, यासाठी बँकांनी किसान क्रेडिट कार्ड आणि इतर कृषी कर्जांचे वितरण जलदगतीने पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. तसेच कर्जमाफी योजनेंतर्गत प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत लागू असलेल्या मदत व सवलतींचा लाभ पोहोचविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

२१ ऑक्टोबर पासून आर्थिक समावेशन मोहीम

केंद्र शासनाच्या आर्थिक समावेशन योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रायगड जिल्ह्यात दि.२१ ऑक्टोबर ते दि.३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत विशेष आर्थिक समावेशन (ऋख डर्ींीरींळेप) मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व बँकांनी ग्रामपंचायती आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून शिबिरांचे नियोजन करावे, नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी आणि आवश्यक निधीची तरतूद वेळेत करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व निश्चित केंद्रांवर शिबिरे आयोजित करून शंभर टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यावर त्यांनी भर दिला.

या मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायत आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या केंद्रांचे संबंधित बँकांना वाटप बैठकीत अंतिम करण्यात आले. त्यामुळे प्रत्येक केंद्रावर नियोजनबद्ध पद्धतीने शिबिरे आयोजित करणे आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत विविध आर्थिक समावेशन योजनांचा लाभ पोहोचविणे सुलभ होणार आहे.

ठडएढख च्या वार्षिक अहवालाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण

बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील ठडएढख च्या वार्षिक अहवालाचे अनावरण करण्यात आले. ग्रामीण भागातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यामध्ये ठडएढख ची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

जिल्ह्यातील कृषी कर्जवाटप, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि आर्थिक समावेशन मोहिमेची यशस्वी पूर्तता यासाठी सर्व बँका आणि शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

# पाणीपुरवठा योजनांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करा, टँकर हा शेवटचा पर्याय ठेवा

### पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश, टँकरच्या डिजिटल नोंदींवर भर

मुंबई (प्रतिनिधी)
पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करून त्या कार्यान्वित कराव्यात. टँकरद्वारे पाणीपुरवठा हा पहिला नव्हे, तर शेवटचा पर्याय असावा, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.



मंत्रालयात नेवासा विधानसभा मतदारसंघातील पाणीटंचाईचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, संबंधित अधिकारी आणि दूरदृश्य प्रणालीद्वारे अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी झाले.

७५ ते ९९ टक्के काम पूर्ण झालेल्या योजनांमधील वीजजोडणी, जलवाहिनी जोडणी, किरकोळ दुरुस्ती आणि निधीअभावी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नेवासा मतदारसंघातील प्रलंबित १८ योजनांपैकी १६ पुनर्बांधणी व सुधारणा योजनांना प्राधान्य देण्यास सांगण्यात आले.

टँकरच्या फेऱ्या, प्रत्यक्ष पाणीपुरवठा आणि वितरण यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डिजिटल नोंद व निरीक्षण प्रणाली लागू करण्यावर भर देण्यात आला. गरजेनुसार विहिरींचे अधिग्रहण, खोलीकरण, गाळ काढणे, तात्पुरत्या जलवाहिन्या आणि आडवे बोअर यांसारख्या पर्यायी उपाययोजना राबवून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याचे निर्देश मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

टँकरवरील अवलंबित्व कमी करा..

वैजापूर आणि गंगापूर विधानसभा मतदारसंघांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी गावनिहाय उपाययोजना कराव्यात आणि टँकरवरील अवलंबित्व कमी करावे, असे निर्देश पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.



# बीड जिल्हा ओबीसी काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी गणेश जवकर यांची निवड

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून सत्कार व अभिनंदन

बीड (प्रतिनिधी)
भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बीड जिल्हा ओबीसी काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी गणेश जवकर यांची निवड करण्यात आली. यानिमित्ताने काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले व पुढील सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी बीड शहर काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी नगरपरिषद सभापती इलयास टेलर, प्रा. हाजी रफिक बागवान, (माजी जिल्हाध्यक्ष तथा ऑल इंडिया मुस्लिम लीग ओबीसी महाराष्ट्र प्रदेशचे राज्य सचिव), काँग्रेसचे प्रदेश सचिव गणेश राऊत, काँग्रेस पक्षाच्या निराधार निराश्रितचे जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख, जहीर शेख, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मिलिंद मस्के, मुस्लिम लीग ओबीसीचे शहराध्यक्ष मोमीन खुद्दूस खान आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# निसर्गाचा अनमोल ठेवा आता एकाच पुस्तिकेत!

## परळी कृषी विभागाकडून ८५ 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' माहिती पुस्तिका प्रकाशित

बीड (जिमाका)
रानभाजी महोत्सवाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना पद्मिनी शंकरराव नागरगोजे यांच्या संकल्पनेतून आणि संपादनाखाली ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली असून, याद्वारे निसर्गाच्या कुशीत दडलेला रानमेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे.

बदलत्या आणि वेगवान जीवनशैलीमुळे आपण नैसर्गिक आणि पौष्टिक आहारापासून दुरावत चाललो आहोत, या पार्श्वभूमीवर ही पुस्तिका सर्वांसाठी एक उत्तम मार्गदर्शक ठरणार आहे. या पुस्तिकेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध भागात आढळणाऱ्या एकूण ८५ रानभाज्यांची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने पालेभाज्या, कंदमुळे, पाण्यातील वनस्पती, वेलवर्गीय भाज्या, झुडपे, वृक्ष आणि बुरशीजन्य भाज्यांचा समावेश आहे. या प्रत्येक रानभाजीचा आढळ कुठे होतो, तिचे आरोग्याच्या दृष्टीने आहारातील महत्त्व काय आहे, तिचे औषधी गुणधर्म कोणते आहेत आणि ती चविष्ट पद्धतीने शिजवण्याची पाककला काय आहे, याची इत्थंभूत माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे.

सध्याच्या काळात भाजीपाल्याच्या उत्पादनात रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर होत असल्याने आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र, रानभाज्या या रानावनात पूर्णपणे नैसर्गिकरीत्या येत असल्याने त्या विषमुक्त, सेंद्रिय आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असतात. ग्रामीण भागातील शेतकरी तसेच शहरी भागातील नागरिकांनी या रासायनिक फवारणीमुक्त रानभाज्यांची अचूक ओळख पटवून त्यांचा आपल्या रोजच्या आहारात आवर्जून समावेश करावा, या मुख्य उद्देशाने या पीडीएफ पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे शहरी ग्राहकांना उत्तम व पौष्टिक आहार मिळेल, तर दुसरीकडे रानावनातून या भाज्या गोळा करून बाजारात विकणाऱ्या ग्रामीण आणि आदिवासी कष्टकरी बांधवांना रोजगाराची व उत्पन्नाची नवी संधी उपलब्ध होऊन मोठा आर्थिक हातभार लागेल.

परळी कृषी विभागाच्या या अभिनव आणि काळाची गरज असलेल्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे. राज्याच्या मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे, परळीचे आमदार धनंजय मुंडे आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या पुस्तिकेच्या निर्मितीबद्दल तालुका कृषी अधिकारी व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन केले असून उपक्रमास लेखी शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांनी, शेतकरी बांधवांनी आणि विशेषतः तरुण पिढीने या पीडीएफ पुस्तिकेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपल्या व आपल्या कुटुंबाच्या सुदृढ आरोग्यासाठी रानभाज्यांचा आहारात नियमित वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता प्रभाव,

## के. एस. के. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

बीड (प्रतिनिधी)
सौ. के. एस. के. महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी 'दैनंदिन जीवनातील कृत्रिम बुद्धिमत्ता : काम, शिक्षण आणि जीवनपद्धतीत होणारे परिवर्तन' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



### शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि रोजगार क्षेत्रात नव्या संधी, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन

या व्याख्यानासाठी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील डॉ. लांडगे योगिता व्ही. प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यवसाय आणि दैनंदिन कामकाजातील कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व व उपयोग याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे भविष्यात रोजगाराच्या अनेक नवीन संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून स्वतःला अद्ययावत ठेवावे. तसेच या तंत्रज्ञानाचा वापर करताना जबाबदारी आणि नैतिकतेचे भान राखावे, असे आवाहन डॉ. लांडगे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ भविष्यातील तंत्रज्ञान नसून वर्तमानातील गरज बनली आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा सकारात्मक व विधायक कामांसाठी उपयोग करून शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगती साधावी, असे त्यांनी नमूद केले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. एस. आर. राऊत, कमावी विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण आणि पर्यवेक्षक प्रा. आसाराम खुटाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सोनाली गवारे यांनी केले, तर प्रा. ऐश्वर्या रुईकर यांनी आभार मानले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळून संगणकशास्त्रातील भविष्यातील संधींबाबत मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# सतीश चव्हाण यांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांचा वैयक्तिक भेटीवर भर

## सूक्ष्म नियोजनामुळे सतीश चव्हाण यांचा विजय सुकर

बीड (प्रतिनिधी) मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचारासाठी नियोजनपूर्वक यंत्रणा काम करत आहे. अतिशय सूक्ष्म नियोजनामुळे सतीश चव्हाण यांचा विजय सुकर होणार आहे. त्यांच्या प्रचारासाठी कार्यकर्त्यांचा मतदारांच्या वैयक्तिक गाठी भेटीवर भर आहे. महायुतीमधील सर्व घटकपक्ष एकदीलाने कामाला लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पहिल्या टप्प्यात बीड जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात पदाधिकाऱ्यांनी मतदारांचा संपर्क वाढविला आहे. प्रत्यक्ष भेटीसह फोनद्वारे मतदारांचा संपर्क करून सतीश चव्हाण यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांच्यासह पदाधिकाऱ्यांकडून केले जात आहे.

मराठवाडा पदवीधर मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्यासाठी ही निवडणुक एकतर्फी होताना दिसत आहे. बीड जिल्ह्यात त्यांचा मोठा दांडगा जनसंपर्क असल्यामुळे मतदारांशी ते कनेक्ट आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून प्रचाराचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. आ.सतीश चव्हाण यांच्या प्रचारासाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री ना.सुनेत्रा पवार, मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह महायुतीच्या प्रमुख नेत्यांची सभा बीडमध्ये होणार आहे. पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मतदारांच्या गाठीभेटींवर भर देत असून चौथ्यांदा आ.सतीश चव्हाण यांना विजयी करण्याचा आग्रह करत आहेत. मागील तीन टर्म आ. सतीश चव्हाण यांनी पदवीधरांचे नेतृत्व करताना केलेल्या कामाचा अहवाल कार्यकर्ते मतदारांसमोर मांडत आहेत. खऱ्या अर्थाने मागील तीन खेपेला त्यांचे निवडून येणे हीच कामाची पावती आहे. राष्ट्रवादीच्या तगड्या नियोजनामुळे सतीश चव्हाण यांचा विजय सुकर होताना दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई आणि बीड विधानसभा मतदार संघात मोठी यंत्रणा सतीश चव्हाण यांच्या विजयासाठी काम करताना दिसत आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीड नगर पालिकेचे नगराध्यक्षा प्रतिनिधी मुजीब शेख, बीड शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी मतदारांना संपर्क करून सतीश चव्हाण यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. नकारात्मक अपप्रचाराला खोडून काढणारा प्रचार आम्ही करत असल्याचे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांनी सांगितले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

## न्याय मिळत नाही म्हणून अपंग शिक्षकाची इच्छामरणाची मागणी.!

# सशिक्षण विभागातील समायोजन प्रक्रियेवर गंभीर आक्षेप, संबंधितांवर कठोर कारवाई करा

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागातील समायोजन प्रक्रियेवरून अपंग शिक्षक विठ्ठल श्यामराव जायभाये यांनी अन्याय व मानसिक छळ होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणाची चौकशी होऊनही संबंधितांवर कारवाई होत नसल्याचा दावा करत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे दाद मागितली आहे. संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच आपल्याला आणि आपल्या पत्नीला इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी टोकाची मागणी त्यांनी निवेदनात केली आहे.

निवेदनानुसार, विठ्ठल जायभाये हे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पेंडगाव, तालुका बीड येथे कार्यरत आहेत. समायोजन प्रक्रियेत आपल्यावर अन्याय करून इतर शिक्षकांना संधी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच तत्कालीन प्रभारी केंद्रप्रमुख मणियार हकीम अशोकनगर शाळा, यांनी जिवे मारण्याची धमकी दिली आणि मानसिक व शारीरिक छळ केला आहे. यापूर्वी




मणियार हकीम यांची चौकशी लावलेली आहे, परंतु चौकशी अहवाल आद्यपही देण्यात आलेला नाही, असेही निवेदनात नमूद केले आहे.

या प्रकरणी त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. मात्र, अहवाल सादर होऊनही दोन महिन्यांपासून संबंधितांवर कारवाई झाली नसल्याचा दावा शिक्षकाने केला आहे. याशिवाय, समायोजन प्रक्रियेत संबंधित शिक्षक अनुपस्थित असतानाही त्यांचे समायोजन करण्यात आल्याचा आक्षेप त्यांनी नोंदविला आहे.दरम्यान, निवेदनात इच्छामरणाची परवानगी मागण्यात आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. संबंधित शिक्षकाच्या आरोपांबाबत प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. प्रशासन याप्रकरणी काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

पत्नीनेही व्यक्त केली चिंता..

विठ्ठल जायभाये यांच्या पत्नी गितांजली जायभाये यांनीही निवेदनात पतीच्या मानसिक स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. पती अनेक दिवसांपासून मानसिक तणावात असून, घरातील परिस्थिती आणि कुटुंबाच्या भविष्याबाबत ते अस्वस्थ असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

दोषींवर कारवाई करण्याची मागणी...

या प्रकरणी संबंधित शिक्षकाने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले असून, त्याच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद बीड आणि प्रसारमाध्यमांना पाठविल्या आहेत. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## ना.रामदास आठवले यांच्या विराट सभेस हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा - बापू पवार

बीड/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता



करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बालाघाटावरील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष बापू पवार, भिकाजी पवार, राजेंद्र शेळके, शहाजी सोनवणे, प्रविण सोनवणे, प्रमोद निर्मळ, संतोष जाधव, विशाल इंगळे, बबलू सोनवणे, आप्पाराव शेळके, अजित सावंत, शिवाजी शिंदे, धर्मराज खंकाळ, दादाराव वाघमारे आदिनी केले आहे.

# केवळ पदव्यांसाठी नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी महाविद्यालयात या - कवयित्री गुंजन पाटील

## गेवराईत शारदा व्याख्यानमालेत गुंजन पाटील यांच्या कवितांनी रसिक मंत्रमुग्ध

गेवराई (प्रतिनिधी)

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासारख्या प्रगल्भ नेतृत्वाकडून सुरु करण्यात आलेल्या शारदा व्याख्यानमालेच्या माध्यमातून गेवराई शहरात विचारांची चळवळ सुरू झाली आहे. या व्यासपीठावर कविता सादर करताना मला अतिशय आनंद होतो आहे. कवितेमुळेच मला समाजाचे प्रेम मिळाले. महाविद्यालयीन युवक - युवतींनी केवळ कागदाच्या पदव्या मिळवण्यासाठी नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी महाविद्यालयात यावे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांनी केले. त्या 'समाजासाठी साहित्य आणि संवादाचे महत्त्व' या विषयावर बोलत होत्या.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून सुरु झालेल्या शारदा व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प सोमवारी, दि.१२ ऑक्टोबर रोजी कवयित्री गुंजन पाटील यांनी गुंफले. शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि र.भ.अट्टल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई येथे शारदा व्याख्यानमाला सुरु करण्यात आली आहे. सोमवार, दि.१२ ऑक्टोबर रोजी सुप्रसिध्द कवयित्री गुंजन पाटील यांनी या व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प गुंफले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अमरसिंह पंडित होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, शिव शारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, प्राचार्या डॉ. रजनी शिखरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात अमरसिंह पंडित यांनी व्याख्यानमालेमागील भूमिका स्पष्ट केली. शारदा व्याख्यानमालेच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदारसंघातील रसिक श्रोत्यांना वैचारिक मेजवानी मिळेल. तसेच या व्यासपीठातून उत्तम वक्ते आणि साहित्यिक घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कवयित्री गुंजन पाटील म्हणाल्या की, मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे आपल्या माणसांसाठी वेळ द्यावा, त्यांच्याशी संवाद साधावा आणि आई-वडिलांच्या विचारांचा व संस्कारांचा आदर करून वाटचाल करावी. युवकांनी स्वतः मधील चांगल्या गुणांचा अभिमान बाळगावा. उत्तम वक्ता होण्यासाठी आणि प्रभावीपणे व्यक्त होण्यासाठी लेखन वाचनाची सवय आवश्यक आहे. समाजातील वाढत्या वाईट घटनांकडे लक्ष वेधताना त्यांनी साहित्याच्या महत्त्वावर भर दिला. माणसातील माणुसकी जागवण्यासाठी आणि समाजाला संवेदनशील बनवण्यासाठी साहित्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर गुंजन पाटील यांनी एकापेक्षा एक



सरस कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांच्या प्रेमकवितांना उपस्थितांकडून वारंवार 'वन्स मोअर'ची दाद मिळाली. 'मला आई व्हायचे नाही' या कवितेने उपस्थितांना अंतर्मुख होऊन विचार करायला लावले. सुमारे दीड तास रंगलेल्या या कार्यक्रमात टाळ्या, हास्य आणि वन्स मोअरच्या प्रतिसादाने गोदावरी सभागृह दुमदुमून गेले. महाविद्यालयीन युवक-युवतींसह नागरिकांची मोठी गर्दी झाल्याने सभागृह खचाखच भरले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. समाधान इंगळे यांनी केले, तर प्राचार्या डॉ. रजनी शिखरे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, महिला, पुरुष, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून आणि गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून सुरु झालेल्या या व्याख्यानमालेला गेवराई शहरातील श्रोत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# वडवणीकरांसाठी लवकरच मिळणार १०८ रुग्णवाहिका
# नगराध्यक्षा जगतापांच्या मागणीची आमदार सोळंकेकडून दखल

वडवणी ।प्रतिनिधी

वडावणी शहरासह परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीने आरोग्यसेवा मिळावी, अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविता यावे, यासाठी वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. वडावणीच्या नगराध्यक्षा सौ. वंदनाताई शेषराव जगताप यांनी केलेल्या मागणीची दखल घेत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय आमदार प्रकाशदादा सोळुंके यांनी पुढाकार घेतला असून, यासंदर्भात बीडचे जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. वडावणीच्या नगराध्यक्षा वंदनाताई शेषराव जगताप यांनी दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी आमदार प्रकाशदादा सोळुंके यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे वडावणी शहरासाठी १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार सोळुंके यांनी लागलीच दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी बीडचे जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवून वडावणी शहरासाठी तातडीने स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. तसेच या पत्राची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनाही देण्यात आली आहे. वडावणी हे तालुक्याचे ठिकाण असून, शहरासह परिसरातील नागरिकांना दोन प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच एक ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जाते. मात्र, वडावणी शहर आणि परिसरातील नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने अपघात, प्रसूती, गंभीर आजार तसेच अन्य वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णांना तातडीने मोठ्या रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासते. अशा परिस्थितीत वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्यास रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गंभीर रुग्णांना योग्य वेळी उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यामुळे वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यास आपत्कालीन आरोग्यसेवा अधिक प्रभावीपणे देण्यास मदत होणार आहे. वडावणी शहरातील आरोग्यसेवेची गरज लक्षात घेऊन नगराध्यक्षा वंदनाताई जगताप यांनी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिकेसाठी पुढाकार घेतला. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार प्रकाशदादा सोळुंके यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे लेखी पत्राद्वारे हा प्रश्न मांडला आहे. वडावणी शहर आणि परिसरातील नागरिकांना अपघात, प्रसूती आणि गंभीर आजारांच्या वेळी तातडीने रुग्णालयात दाखल करता यावे, तसेच रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णवाहिकेअभावी होणाऱ्या अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आमदार सोळुंके यांनी आपल्या निवेदनात अधोरेखित केली आहे. आमदार प्रकाशदादा सोळुंके यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक कार्यवाही जलद गतीने करण्याची विनंती केली आहे. या पत्राची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनाही पाठवण्यात आली आहे. त्यामुळे या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून पुढील कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आ. प्रकाश सोळुंके वडावणीकरांच्या मदतीसाठी सदैव तत्पर!

वडावणी शहरासह मतदारसंघातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आमदार प्रकाशदादा सोळुंके नेहमी तत्पर असतात. नागरिकांच्या मूलभूत गरजा असोत, आरोग्यसेवेचे प्रश्न असोत किंवा विकासाकामांची मागणी असो, संबंधित प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर मार्ग काढण्यासाठी ते पुढाकार घेतात. नगराध्यक्षा वंदनाताई जगताप यांच्या मागणीनुसार वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन त्यांनी पुन्हा एकदा आरोग्यसेवेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. नगराध्यक्षा वंदनाताई जगताप यांच्या मागणीला पाठबळ देत त्यांनी केलेला हा पाठपुरावा वडावणीकरांच्या आरोग्यविषयक गरजांबाबतची त्यांची संवेदनशीलता अधोरेखित करतो. जनतेची गरज ओळखून प्रश्नांना वाचा फोडणे आणि त्यासाठी प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करणे, हीच जनसेवेची खरी ओळख आहे.

दरम्यान वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यास शहरासह परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मोठा दिलासा मिळू शकतो. विशेषतः अपघातग्रस्त, गर्भवती महिला आणि गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नगराध्यक्षा वंदनाताई



जगताप यांनी उपस्थित केलेल्या या महत्त्वपूर्ण मागणीसाठी आमदार प्रकाशदादा सोळुंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केल्याने वडावणी शहरासाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका उपलब्ध होण्याच्या मागणीला मोठे बळ मिळाले आहे. आता जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभाग यावर काय निर्णय घेतात, याकडे वडावणीकरांचे लक्ष लागले आहे.

# शिरूरच्या कालिका देवी मंदिरात साडेतीन पिठाची उपासना !

## संगित श्रीमद् दैवी भागवत कथैत प्रथम पुष्प समर्पीत !

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील कालिका देवी मंदिरात एकाच वेळी साडेतीन शक्तिपिठाची अनुभुती येत असल्याचे प्रतिपादन श्रीमद् देवी भागवत कथेचे प्रथम पुष्प समर्पित करतांना कथा प्रवक्त्या सौ रजनीताई जाधव यांनी केले . सिध्देश्वर संस्थानचे उत्तराधिकारी महंत विवेक महाराज शास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली नवरात्र महोत्सवात देवी भागवत कथेचे आयोजन केले असुन सोमवारी प्रथम पुष्प समर्पित केले गेले . मंदिरात एकाच ठिकाणी साडेतीन शक्तिपिठाची अनुभुती येत असुन माय ज्ञानेश्वरी एक शक्तिपिठ तर दुसरे सप्तशती पाठ तर तिसरे देवीभागवत कथा आणि त्यातच कालिका पुराणवाचन असे साडेतीन शक्तिपिठाची अनुभुती येत आहे . कथेच्या माध्यमातून श्रावणातील श्रवण , तर गणेश पुजन , पितृपक्षात पितृस्मरण व त्यांचे अशिर्वचन , तर




नवरात्री महोत्सवात कालिकामातेचे विविध स्वरूप दर्शन घडत असल्याचे सांगितले. साधारणपणे रात्र ही निवांत विश्रांती म्हणून झोप घेतली जाते मात्र नवरात्र हा झोपी जाण्याची नसुन या काळातून झोपेतून जागे होण्यासाठी कथा ,कीर्तन , भजन या पध्दतीने उपासना करण्यासाठी असतात . देवतेची उपासना केल्यानंतर उपासना करणाराला तर त्याची फलश्रुती मिळतेच शिवाय त्या उपास्य देवतेची महती वाढते असेही सांगितले .

सात दिवस देवीभागवत कथेतून देवीचे महात्म सांगितले जाणार असुन कथेला संगिताची जोड व कथानुरूप रूपदर्शन (झाकी ) साकारल्या जात आहेत .

मंगल कलश पुजन !

यावेळी महंत विवेक महाराज शास्त्री व कालिकादेवी संस्थानचे सचिव लक्ष्मण गाडेकर यांनी सपत्निक पुजा जयमानपद निभावले .




# छत्रपती संभाजी नगर संघावर मात करत प्रथम क्रमांक ; मुलींच्या संघाला उपविजेतेपद

केज/प्रतिनिधी

क्रिडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड आणि जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागस्तरीय १९ वर्षां खालील सॉफ्टबॉल स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालय, केजच्या मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम लढतीत छत्रपती संभाजीनगर संघावर विजय मिळवत या संघाने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.विशेष म्हणजे, विद्यालयाने राज्यस्तरा वर मजल मारण्याची आपली परंपरा कायम राखली आहे.याच स्पर्धेत विद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघानेही उपविजेतेपद मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.मुलांच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांना टक्कर दिली. छत्रपती संभाजीनगर संघावर मात करून प्रथम क्रमांक मिळवल्याने खेळाडूंच्या मेहनतीला यश आले आहे.आता हा संघ दि.१५,१६ व १७ ऑक्टोबर रोजी जळगाव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे.या स्पर्धेत संघ छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.या यशस्वी संघाला क्रीडा शिक्षक श्री.सानप सर आणि श्री.दीपक साखरे सर, दत्तात्रय घुले सर यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी केलेली मेहनत,नियमित सराव, सांघिक समन्वय आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, सॉफ्टबॉल संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. दिनकर थोरात, संस्थाध्यक्ष अड. उद्धवराव कराड, उपाध्यक्ष राजेश कापसे,सॉफ्टबॉल प्रशिक्षक श्री.सतीश राठोड,बेसबॉल प्रशिक्षक श्री.रेवन्नाथ शेलार,राष्ट्रीय खेळाडू श्री.संदीप तांदळे, श्रीनिवास सानप, शिवनारायण साबळे, श्री.सचिन,श्रीमती क्षितिजा गव्हाणे, विद्यालयाच्या मार्गदर्शिका तथा प्राचार्य डॉ.कविता गीते-कराड,दीपाली कांदे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड येथील संबंधितांनी विजयी खेळाडू,प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.राज्य स्तरीय स्पर्धेतही साने गुरुजी निवासी विद्यालयाचा संघ उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन करेल,असा विश्वास व्यक्त करत सर्वांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बीड जिल्ह्यातील दुष्काळ निवारणासाठी मास्टरप्लॅन!

## ग्लोबल विकास ट्रस्ट आणि जिल्हा प्रशासन एकत्रितपणे करणार काम; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा कृषीकुल दौरा



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि गरजू कुटुंबांना आधार देण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बीड जिल्हा प्रशासन एकत्रितपणे काम करणार आहेत. कृषीकुल येथे झालेल्या बैठकीत जिल्ह्याच्या विकासासह दुष्काळ निवारणाचा मास्टरप्लॅन आखण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांच्या दोन दिवसीय कृषीकुल दौऱ्यादरम्यान जलनायक मयंक गांधी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी ग्लोबल विकास ट्रस्टने दुष्काळ निवारणासाठी दहा कलमी कार्यक्रम मांडला. यामध्ये १५ हजार गरीब शेतकरी कुटुंबांना रेशन किट वाटप, अन्नछत्र, जलतारा उभारणी, गाळमुक्त धरण, नद्यांचे पुनरुज्जीवन, रिचार्ज शाफ्ट, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि चारा छावण्यांसाठी सहकार्य अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

दुष्काळात कोणतेही शेतकरी कुटुंब अन्न-पाण्याविना अडचणीत येऊ नये, या भावनेतून ग्लोबल विकास ट्रस्ट प्रशासनाला सहकार्य करणार असल्याचे मयंक गांधी यांनी सांगितले. तर दुष्काळ निवारणासाठी संस्थेच्या अनुभवाचा आणि तांत्रिक पथकाचा उपयोग करून प्रशासन समन्वयाने काम करेल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी स्पष्ट केले. बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शासनाचे नियोजन आणि सामाजिक संस्थेचा लोकसेवेचा संकल्प एकत्र आल्याने दुष्काळग्रस्त गावांना दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

# नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे नव दुर्गांच्या हस्ते उद्घाटन

## महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,दररोज दांडीया स्पर्धासह विविध स्पर्धांसाठी आकर्षक बक्षीसे



परळी(प्रतिनिधी)

सौ.श्रध्दा हालगे-फुलारी या आरोही स्टाईल स्टुडीओच्या माध्यमातुन परळी शहरातील बेलवाडी येथे दरवर्षी दांडीया महोत्सवाचे आयोजन करत असतात.यावर्षी आगळ्या वेगळ्या पद्धतीने नऊ बाल दुर्गांच्या हस्ते दांडीया महोत्सवाचे उद्घाटन करत नारीशक्ती चे वेगळेपण जपले.या दांडीया महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दररोज आयोजित करण्यात येत असलेल्या वेगवेगळ्या स्पर्धांच्या माध्यमातून पैठणीसह आकर्षक बक्षीसे विजेत्या महिलांना देण्यात येणार आहेत.

आरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका सौ.श्रध्दा हालगे-फुलारी या दरवर्षी वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या गुरुलिंग स्वामी मंदिर,बेलवाडी येथे दांडीया महोत्सवाचे आयोजन करत असतात यावर्षी दि.१२ ते १९ ऑक्टोबर दरम्यान आयोजीत या दांडीया महोत्सवात दररोज दांडिया स्पर्धा होत आहेत.या दांडीया महोत्सवाचे उद्घाटन दांडीया खेळण्यासाठी आलेल्या नऊ मुलींच्या हस्ते दिपप्रज्वलन,दुर्गामातेची पुजा करुन करण्यात आले.कुमारीका असलेल्या या नवदुर्गांचे स्वागत संयोजिका सौ.श्रध्दा हालगे-फुलारी व इतर महिलांनी केले.दांडीया स्पर्धेचे असे आगळेवेगळ्या पध्दतीने उद्घाटन करण्यामागची भुमिका सांगताना सौ.हालगे यांनी नारी ही समाजाचे आणि देशाचे भविष्य आहे,आयुष्यात येणार्या संकटांचा हसत-खेळत सामना करता यावा यासाठी दांडीया सारख्या खेळांच्या स्पर्धांचे उद्घाटन प्रसिद्ध व्यक्तींच्या हस्ते करण्याऐवजी मुलींच्या हस्ते करण्याचा माझा उद्देश असल्याचे सांगितले.पहिल्या दिवशी सोमवार दि.१२ ऑक्टोबर रोजी आरती ताट सजावट,शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर रोजी खेळ पैठणीचा आणि सोमवार दि.१९ ऑक्टोबर रोजी फॅन्सी ड्रेस स्पर्धा होणार आहेत.या स्पर्धांमध्ये विजेत्या महिला स्पर्धकांना,सोन्याची नथ,आकर्षक पैठणी,आकर्षक साडी,आकर्षक गिफ्ट हॅम्पर अशी बक्षीसे देण्यात येणार आहेत.सोमवार दि.१२ ऑक्टोबर रोजी पहिल्या दिवशी दांडीया महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.आरती ताट सजावट स्पर्धेत असंख्य महिलांनी वेगवेगळ्या आकाराची उत्कष्ट ताट सजावट करत सहभाग नोंदवला.महिलांसाठी मोफत असलेल्या नारीशक्ती दांडीया महोत्सवात परळी शहरातील महिला व युवतींनी सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजिका सौ.श्रध्दा हालगे-फुलारी यांनी केले आहे.

# गप्पेवाडी येथे पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण! ग्रामसेवकांचे दुर्लक्ष
# टँकरसाठी बीडीओंकडे धाव




केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील गप्पेवाडी येथे पाणी टंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला असून पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत असल्याची परिस्थिती समोर आली आहे. गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्या साठी गटविकास अधिकारी,पंचायत समिती केज यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.एकीकडे नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असताना,दुसरीकडे ग्रामसेवकांचेही या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर नेमके कोणते प्रयत्न सुरू आहेत,असा सवालही उपस्थित होत आहे.

ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी आणखी किती प्रतीक्षा करावी लागणार पाणीटंचाईच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्या ऐवजी नागरिकांना त्रास सहन करावा लागत असेल,तर जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.गटविकास अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गप्पेवाडी येथे टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू करावा आणि संबंधित यंत्रणेच्या कामकाजाची चौकशी करावी,अशी मागणी होत आहे.आता तरी प्रशासन जागे होणार का,की गप्पेवाडी करांची पाण्यासाठीची वणवण सुरूच राहणार असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

## सुशील घोटे यांची मतदार संघात सुप्त लाट

# लाटेचे रुपांतर विजयात करण्यासाठी त्यांनाच प्रथम पसंतीची मते देवून विजयी करा - बंडू अघाव



परळी / प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघात २३ ऑक्टोंबर रोजी निवडणूक होत आहे. निवडणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघाने सुशील सुरेशराव घोटे यांच्यासारखा तरुण तडफदार,अभ्यासू व नवजवान युवकाला उमेदवारी दिली आहे.त्यांच्या बाजूने मतदारसंघात सुप्त लाट निर्माण झाली असून या लाटेचे रुपांतर विजयात करण्यासाठी मतदारांनी सुशील घोटे यांनाच प्रथम क्रमांकाच्या पसंतीची मते देऊन विजयी करावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी केले आहे.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची येत्या २३ ऑक्टोंबर रोजी निवडणूक होत आहे.सुशील घोटे हे मराठवाडा शिक्षक संघाची अधिकृत उमेदवारी घेऊन स्वतः हाचे नशिब आजमावत आहेत.त्यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील विविध शाळा/ महाविद्यालयांना बंडू अघाव यांनी भेटी दिल्या यावेळी तेथील मतदारांशी संवाद साधताना अघाव यांनी वरील प्रमाणे आवाहन केले.

पुढे बोलताना अघाव म्हणाले की, मराठवाडा शिक्षक संघाने प्रथमच या मतदारसंघात सुशील घोटे यांच्या रूपाने अधिकृत उमेदवार दिला असून तो संघटनेचे माजी शिक्षक आमदार स्व.प.म.पाटील यांचे पुतणे आहेत.घोटे हे तरुण तडफदार व अभ्यासू आहेत.त्यांना निवडून दिल्यास ते सभागृहात विद्यमान आमदारासारखे हाताची घडी तोंडावर बोट असे न बसता ते निश्चितच शिक्षक, प्राध्यापक व पदविकाधारकांच्या प्रश्नांना वाचा फोडल्याशिवाय व न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहीत असा विश्वास अघाव यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी त्यांच्या सोबत स्वतः उमेदवार सुशील घोटे,मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, तालुका अध्यक्ष अनुप कुसूमकर, उपाध्यक्ष ज्ञानोबा गडदे, कोषाध्यक्ष एकनाथ लांडगे, संजय फड आदी उपस्थित होते.

प्रत्येक शाळा/महाविद्यालयात उमेदवारांचे उत्साह पुर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

# ऐतिहासिक समता क्रांती मार्च मध्ये मोठ्या संख्येने उपस्थित रहा - दीपक (भाऊ) कांबळे



केज/प्रतिनिधी

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात, उपवर्गीकरणाचा डाव हाणून पाडण्यासाठी दि.१६ ऑक्टोबर रोजी बीडमध्ये होणाऱ्या, समता मार्च रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन युवा रिपाइंचे केज तालुकाध्यक्ष दीपक भाऊ कांबळे यांनी केज येथे दिपक कांबळे यांनी केले आहे.दि.१६ ऑक्टोबर रोजी देशाचे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाच्या प्रांगणावर,युवा रिपाइं चे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी समता क्रांती मार्च आयोजित केला आहे.यामध्ये २०११ पर्यंत कसत असलेल्या गायरान जमिनीवर अतिक्रमणे नियमित करण्यात यावीत.शिष्यवृत्ती, स्वाधार योजनेचे अनुदान महागाई निर्देशांकानुसार वाढवावे.अनुसूचित जातीच्या आरक्षणा तील अ,ब,क,ड उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे.तसेच राज्यात पडलेल्या महाभयानक दुष्काळात शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर एक लाख रुपये आणि शेत मजुरांना प्रत्येकी ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे या मागणीसाठी कार्यक्रम आयोजित केला आहे. समता क्रांती मार्च मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांनी समता मार्च रॅलीच्या अनुषंगाने संपूर्ण केज तालुक्यात बैठका आणि भेटी देऊन वातावरण निर्मिती केली आहे.तेव्हा केज तालुक्यातून जास्तीत जास्त संख्येने महिला, पुरुष आणि युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या सह जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड,तालुका सरचिटणीस गौतम बचुटे,ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे,तालुका उपाध्यक्ष रमेश निशिगंध,उपाध्यक्ष विकास आरकडे, प्रशांत हजारे,सुरज काळे,कैलाश जावळे, सचिन मस्के,दादाराव धेंडे,नाना गायकवाड, शरद धिवार,विनोद गायकवाड,भारत गायकवाड,निलेश ढोबळे,रोहित कांबळे, राहूल काळे,मल्हारी गायकवाड,अविनाश गायकवाड,हरेंद्र धिरे, सुरेश गायकवाड, संभाजी हजारे,हरेंद्र तुपारे,राहूल काळे, विनोद शिंदे,शोएब शेख,शाम गुळवे, प्रदीप शिनगारे, बाळासाहेब कांबळे, अशरफ शेख,सुशिल कांबळे,सुरेखा गायकवाड,अनिता वाघमारे,सरस्वती शिनगारे

# गौरी महालक्ष्मी सजावट आणि राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न

## शारदा प्रतिष्ठान आणि र.भ.अट्टल महाविद्यालय आयोजित स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद



गेवराई (प्रतिनिधी)

आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदार संघातील महिलांसाठी गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धा आणि माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त र.भ.अट्टल महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना माजी आमदार अमरसिंह पंडित आणि सुप्रसिध्द कवयित्री गुंजन पाटील यांच्याहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अश्विनी कापसे यांनी शहरी विभागातून तर कौशल्या मोटे यांनी ग्रामीण विभागातून गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे प्रथम पारितोषिक पटकावले. वक्तृत्व स्पर्धेत डॉ.दिपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज बोरपाडले कोल्हापूरच्या कु.ऋतूजा शिवदास मुंडे रु.७,०००/- व सन्मानचिन्ह पटकावले. सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकाचे वाटप करण्यात आले.

शारदा प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये शहरी विभागातून सौ. अश्विनी योगेश कापसे यांनी प्रथम पारितोषिक रु. १५,०००/- व सन्मानचिन्ह, सौ. प्रियंका अनिकेत चव्हाण यांनी व्दितीय पारितोषिक रु. ११,०००/- व सन्मानचिन्ह तर सौ. सायली संदेश रुकर यांनी तृतिय पारितोषिक रु. ७०००/- व सन्मानचिन्ह पटकावले. उत्तेजनार्थ पारितोषिक सौ. कालिंदा दिपक आतकरे रु. ३०००/- व सन्मानचिन्ह आणि सौ. शिला नवनाथ पैठणे यांनी रु. ३०००/- व सन्मानचिन्ह पारितोषिक पटकावले. ग्रामीण विभागातून सौ. कौशल्या अरुण मोटे, (ताकडगांव) यांनी रु. १५०००/- व सन्मानचिन्ह, सौ. योगिता सर्जेराव तांबारे (सिरसमार्ग) द्वितीय पारितोषिक रु. ११०००/- व सन्मानचिन्ह आणि तृतीय पारितोषिक सौ. मनिषा सुदाम शिंदे ( तलवाडा) यांनी रु. ७०००/- व सन्मानचिन्ह पटकावले तर उत्तेजनार्थसौ. आरती वैभव मिटकर, ( ताडसोन्ना) यांनी रु. ३०००/- व सन्मानचिन्ह, सौ. रुपाली संभाजी वादे यांनी रु. ३०००/-व सन्मानचिन्ह व सौ. शितल आकाश लांडे रु. ३०००/- यांनी पटकावले.वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक डॉ.दिपक पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज बोरपाडले कोल्हापूरच्या कु.ऋतूजा शिवदास मुंडे रु.७,०००/- व सन्मानचिन्ह, द्वितीय पारितोषिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरच्या गहिनीनाथ निवृत्ती आव्हाड यांनी रोख रु.५,०००/- व सन्मानचिन्ह पटकावले, तृतीय पारितोषिक देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय चिखली, जि.सांगली रोख रु.३,०००/- व सन्मानचिन्ह पटकावले. उत्तेजनार्थ पारितोषिक शिवाजी महाविद्यालय, परभणीच्या हनुमान आहेर तसेच बी.जे.एस. महाविद्यालय पुणेच्या गोविंद भांड या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे रोख रु.१,०००/- व सन्मानचिन्ह पटकवले. सर्व विजेत्यांना शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित आणि सुप्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आली.यावेळी झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, शिव शारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित

# श्रीक्षेत्र अरण येथे संत सावता महाराज मंदिराच्या विकासकामांची पाहणी

मानूर ।प्रतिनिधी

श्रीक्षेत्र अरण येथील संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिराला सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी भेट देऊन श्री संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतले.यावेळी त्यांनी प्रशासनामार्फत मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली.याप्रसंगी संत शिरोमणी सावता महाराज यांचे वंशज तथा श्री संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्ट,तीर्थक्षेत्र अरणचे अध्यक्ष गुरुवर्य ह.भ.प.श्री.सावता महाराज वसेकर यांच्याशी मंदिराच्या विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.श्रीक्षेत्र अरण हे संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधीमुळे महाराष्ट्रातील लाखो वारकरी आणि भाविकांचे श्रद्धास्थान आहे.या पवित्र तीर्थक्षेत्राचा विकास अधिक चांगल्या पद्धतीने व्हावा, मंदिर परिसरात भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि विकासकामांना गती मिळावी,यासाठी सर्वांनी एकजुटीने सहकार्य करावे,असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी यावेळी केले.याप्रसंगी चेअरमन भगवानराव पाखरे, मच्छिंद्र आण्णा मिसाळ,पत्रकार प्रकाश साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.




**मंदीर परिसरातील विकास कामासाठी सर्वांनी सहकार्य करावे आजीनाथ गवळी**

# दुष्काळाने मेंढपाळांचे जगणे कठीण मेंढ्यासह बदनापूर तहसीलवर मोर्चा धडकला तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांना निवेदन

## चारा-पाण्यासाठी वणवण पशुधन उपासमारीच्या छायेत सहा मागण्यांसाठी मेंढपाळांचा एल्गार

एक रुपयात मेंढी विमा मोफत चराई पास दुष्काळी अनुदान आणि घरकुलासाठी निधीची मागणी

जालना शेख फारुक : दुष्काळाच्या झळांनी शेतीबरोबरच मेंढपाळांचाही संसार संकटात सापडला आहे.चारा नाही पाणी नाही आणि पशुधन जगवण्यासाठी वाढता खर्च सहन करण्याची आर्थिक ताकदही उरलेली नाही.अशा परिस्थितीत मेंढ्या जगवायच्या कशा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा असा गंभीर प्रश्न बदनापूर तालुक्यातील मेंढपाळांसमोर उभा ठाकला आहे.या संकटाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल मेंढपाळ बांधव आणि धनगर समाज संघर्ष समितीने मेंढ्यांसह बदनापूर तहसील कार्यालयावर मोर्चा काढत सहा प्रमुख मागण्यांसाठी आवाज उठवला. तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांना निवेदन देऊन मेंढपाळांना तातडीने मदत देण्याची मागणी करण्यात आली.

दुष्काळाची झळ पशुधनालाही मेंढपाळ हवालदिल

मेंढीपालन हा ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा पारंपरिक व्यवसाय आहे.मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे चारा-पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून मेंढ्यांचे पालनपोषण करणे जिकिरीचे बनले आहे. उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेल्या मेंढ्यांना जगवण्यासाठी मेंढपाळांची धडपड सुरू आहे.एका बाजूला पशुधन वाचवण्याची चिंता तर दुसऱ्या बाजूला कुटुंबाच्या रोजीरोटीचा प्रश्न अशा दुहेरी संकटात मेंढपाळ अडकले आहेत.दुष्काळाच्या काळात केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचाच नव्हे तर पशुधनावर उदरनिर्वाह करणाऱ्या मेंढपाळांचाही विचार होणे आवश्यक आहे. चारा-पाण्याअभावी पशुधनाचे नुकसान झाल्यास संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक आधारालाच धक्का बसू शकतो.त्यामुळे शासनाने तातडीने विशेष उपाययोजना करून मेंढपाळांना दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात आली.सहा मागण्यांचा एल्गार शासनाने तातडीने निर्णय घ्यावा मेंढपाळांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी निवेदनातून सहा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत.मोफत चारा-पाणी आणि दुष्काळी अनुदान द्या

दुष्काळामुळे मेंढ्यांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करणे कठीण झाले आहे. त्यामुळे मोफत चारा-पाणी उपलब्ध करून द्यावे किंवा विशेष दुष्काळी अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावे.प्रत्येक मेंढीचा विमा अवघ्या एक रुपयात करा शेतकऱ्यांप्रमाणे मेंढपाळांच्या पशुधनालाही विमा संरक्षण मिळावे.प्रत्येक मेंढीसाठी केवळ एक रुपया प्रीमियम असलेली विमा योजना सुरू करून पशुधनाच्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण द्यावे.

मेंढपाळांवरील हल्ले आणि छळवणूक रोखा

मेंढपाळांना स्थलांतरादरम्यान तसेच विविध गावांच्या परिसरात सुरक्षा समस्यांना सामोरे जावे लागते.हल्ले पशुधन चोरी आणि छळवणुकीच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर संरक्षण द्यावे आणि पोलिस प्रशासनाने प्रभावी उपाययोजना



कराव्यात.वनक्षेत्रात चराई पास उपलब्ध करून द्या

चाऱ्याची टंचाई लक्षात घेता लागू वनविषयक कायदे व नियमांच्या अधीन राहून मेंढ्यांच्या चराईसाठी मोफत किंवा सवलतीच्या दरात परवानगी द्यावी.शेळी-मेंढी विकास महामंडळाला भरीव निधी द्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाला पुरेसा निधी उपलब्ध करून मेंढपाळांच्या आर्थिक उन्नतीसाठी आणि पशुधन विकासासाठी प्रभावी कल्याणकारी योजना राबवाव्यात.अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेचे उद्दिष्ट वाढवा बेघर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल मेंढपाळ कुटुंबांना हक्काचे घर मिळावे यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेला भरीव निधी देऊन घरकुलांचे उद्दिष्ट वाढवावे.

पालकमंत्री,महसूलमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींचे वेधले लक्ष

मेंढपाळांच्या मागण्यांबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा यासाठी पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजाताई मुंडे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,आमदार नारायण कुचे आणि बदनापूरचे पोलीस निरीक्षक यांच्याकडेही निवेदनाद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.या निवेदनावर जय मल्हार किसान सेनेचे जिल्हाध्यक्ष कृष्णाभाऊ खरात आणि धनगर समाज संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष बालाजी कानुले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.यावेळी पांडुरंग कोल्हे,धर्मराज भोजने,सोपान भाड,जनार्दन चोरमारे,बजरंग वैद्य,राज सोलाट,संदीप काळे,कोल्हे महाराज,राजू बकाल यांच्यासह सकल मेंढपाळ बांधव उपस्थित होते.

## ओंकार शुगर्सच्या दारावर ऊस उत्पादक शेतकरी

# हंगाम सुरू होण्यापूर्वी दर जाहीर करा

परळी / प्रतिनिधी

हंगाम सुरू होण्यापूर्वीच उसाचा भाव जाहीर करा, असा सज्जड इशारा देत ओंकार शुगर्स पांगरी कारखान्यावर ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने निवेदनाद्वारे प्रशासनाला मागणी केली. ओंकार शुगर्सचे बुधवार दि १४ रोजी बॉयलर प्रदीपन असून याच्या पूर्वदिनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सावध होत ऊसाचा दर घोषित केल्याशिवाय कारखान्याचे गाळप सुरू करू नये, अशी संतप्त मागणी निवेदनाद्वारे लावून धरली.




एकीकडे भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे, तर दुसरीकडे खते, सिंचन, औषध फवारणी आणि मजुरीसह शेतीचा इतर निविष्ठा खर्च कैक पटीने वाढला आहे. बाजारात साखरेचे भाव गगनाला भिडले आहेत. साखर आणि इतर सह-उत्पादनांतून (बाय-प्रॉडक्ट्स) नफा मिळत असताना, त्याच प्रमाणात उसालाही योग्य व न्याय्य दर मिळणे आवश्यक असून दरवर्षी गळपानंतर मनमानी पद्धतीने दर ठरवण्याची जुनी पद्धत आता शेतकरी खपवून घेणार नाहीत. कारखाना सुरू होण्याआधीच पहिली उचल आणि अंतिम दर स्पष्ट व्हावा, अशी भूमिका यावेळी संघर्ष समितीने घेतली आहे.

यावेळी ऊस उत्पादक युवा शेतकरी संघर्ष समितीचे कॉ.मुरलीधर नागरगोजे, ॲड. श्रीनिवास मुंडे, देविदास कराड,दत्ताभाऊ गव्हाणे, अविनाश मुंडे बिबीशन गीते, सोपान तिडके, हरिश्चंद्र मुंडे, शिवदास लोणकर, सचिन तिडके, गोविंद मुंडे, अरुण मुंडे, परमेश्वर मुंडे, विशाल तिडके, सिद्राम सोळंके, व्यंकट दिगंबर तिडके, हनुमंत माने, सुमंत उंबरे, देविदास कांबळे, मदन वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाईचे द्वैवार्षिक पुरस्काराची घोषणा

## सतीश घाडगे, संध्या सोळंके व विद्याधर पांडे यांना पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईचे दर दोन वर्षांनी दिले जाणारे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. स्व. प्राचार्य डॉ.संतोष मुळगावकर शिक्षक लेखक पुरस्कार प्रा. सतीश घाडगे, स्व. प्राचार्य डॉ. शैला लोहिया लेखिका पुरस्कार संध्या सोळंके शिंदे यांना व स्व. मंदा देशमुख कथा लेखक पुरस्कार विद्याधर पांडे यांना देण्याचा निर्णय घेण्यात आले आहेत अशी माहिती मसाप अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे व सचिव गोरख शेंद्रे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.







मसाप अंबाजोगाईच्या कार्यकारिणीची बैठक नुकतीच अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यात हे पुरस्कार देण्याची चर्चा झाली. त्यात वरील पुरस्कार जाहीर करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पहार व दोन हजार रुपये रोख असे आहे. प्रा. डॉ . सतीश घाडगे यांचे गाव गढी - कादंबरी, घराला घरपण देताना - कविता संग्रह व डिगऱ्यांचे भेंडोळे - कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. संध्या सोळंके शिंदे यांचे मधली सुट्टी ही पुस्तक बाल भारतीच्या वतीने प्रकाशित झाले आहे. विद्याधर पांडे यांचे आपतीचा पाऊस, काळ्या आईच्या कुशीत हे कविता संग्रह, मांजराकाठ, मराठी हिंदुराव नायक, देहाचीया रंगी या तीन कादंबऱ्या, क्षण एक नात्याचा ही एकांकिका, शाल्मली हे ललीत प्रकाशित आहे. आत्मचरित्र (ऑर्बिट), दीर्घकथा (नामांतर) व कथासंग्रह (गुरंढोरं) हे प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

हे पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित १२ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनात प्रदान कर.यात येतील. बैठकीस अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. शैलजा बारुरे, सचिव गोरख शेंद्रे, कोषाध्यक्ष मंजुषा सबनीस, मार्गदर्शक अमर हबीब, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य दगडू लोमटे व इतर कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. पुरस्कार घोषणा झाल्यानंतर सर्वांचे अभिनंदन होत आहे.

## भक्तांच्या नवसाला पावणारी रेणुका माता

# नवरात्र निमित्त श्री सतीशआपा रुकर

**आश्विन महिना सुरू होताच वेध लागतात नवरात्र उत्सवाचे गेवराई शहरात हा उत्सव अत्यंत उत्साहात साजरा होतो. गेवराई शहराच्या मध्यभागात असलेले श्री रेणुका देवी मंदिर नवरात्रात भक्तगणांनी फुलून गेलेले असते. गेवराई शहराचे आराध्यदैवत असलेले श्री रेणुका माता मंदिर मोठे विलोभनीय दिसते. देवीच्या साडेतीन पीठांपैकी एक पीठ असलेले माहूर या देवीचे मूळ रूप स्वरूप आहे. भक्तांच्या हाकेला धावून जाणारी व भक्तांची इच्छापूर्ती करणारी देवी असे भाविकामध्ये स्थान निर्माण करणारी श्री रेणुकादेवी आहे. एक जागृत देवस्थान म्हणून गेवराई व परिसरात हे मंदिर ओळखले जाते.**

**मंदिराच्या गाभार्यात**

**सुंदर असा तांदळा (मुखवटा) आहे.देवीच्या चेहऱ्यावर तेजपुज्य व मनमोहक असे भाव दिसतात. मंदिरात प्रवेश केल्यानंतर मन प्रसन्न होते, प्रफुल्लीत होते. रेणुकामातेचे मूळ स्वरूप ३३ कोटी देवांची माता आदी माता आहे म्हणून तिने आपला पुत्र परशुरामास फक्त अर्धमुखातून दर्शन दिले याच कारणामुळे या देवीचे मुख तांदळाचे आहे. देवीचा शेंदूरमय तांदळा हाच ओंकार-स्वरूप कल्याणकारक आहे.**

रेणुका देवीची माहिती

स्कंद पुराणात सांगितली आहे की, रेणुका देवीचा जन्म हा आरंभाच्या युगात म्हणजे त्यास कृतयुग म्हणतात. या काळात रेणु नावाचा राजा होता. त्या राजाने एक यज्ञ केला त्या यज्ञातून अग्नी नारायणाने प्रसाद म्हणून एक कन्या अर्पण केली. या कन्येचे नाव रेणुका असे ठेवण्यात आले त्या मुलीचे स्वयंवर रचले गेले. या स्वयमवरा मध्ये राजे-महाराजे, ब्राह्मण अनेक प्रकारच्या विद्वानांना आमंत्रित केले. या आमंत्रितामध्ये विद्वान, गुणवान, सर्वज्ञ, अष्टपैलू आशा जमदग्नीशी रेणुकाचे स्वयंवर पार पडले. परंतु हा विवाह जातीवंत राजे इतर लोकांना मान्य झाला नाही कारण मुलगी राजकन्या व मुलगा साधा ब्राह्मण होता. त्यांना अपमान वाटू लागला. पुढे त्यांच्यात युद्ध झाले या घनघोर युद्धात शेवटी जमदग्नीचा विजय झाला. पुढे त्यांना पाच मुले झाली त्यापैकी परशुराम एक. परशुराम अतिशय जिद्दी व धाडसी होता. परशुरामाने वडिलांची आज्ञा घेऊन शिव व श्रीगणेश यांची घोर तपश्चर्या करून शस्त्रे मिळवली. पुढे एके दिवशी रेणुकामातेने परशुरामाला आज्ञा केली कि पृथ्वीवरील सर्व तीर्थ एकाच जागी असलेल्या जागेवर माझी प्राणप्रतिष्ठापना कर. परशुरामाने आईच्या आज्ञेनुसार सिंह पर्वतावरील श्रीक्षेत्र माहूर येथे देवीची स्थापना केली.

रेणुका माता म्हणजे जगात अवतरून साध्वी, सती, पतीव्रता असल्यामुळे तिला त्रिलोकातील देव-दानव गंधर्व व अप्सरा सुद्धा देवीचा जयजयकार करतात. गेवराई येथिल रेणुका गौरी स्वरूपातील राहिली म्हणून ही जगदंबा गौरी स्वरूपी आहे. गौरपुर हे पूर्वीचे नामाभियान आहे. या मंदिरात सभामंडपाच्या बाजूला महादेवाचे सिद्धेश्वर मंदिर आहे. तसेच एक आकर्षक दीपमाळ ही आहे. मंदिरासमोर एक यज्ञ कुंड आहे. अश्विनी शुद्ध नवमीच्या दिवशी विद्वान ब्राह्मणाच्या उपस्थितीत मंत्रोच्चाराने यज्ञाला देण्यात येते. या यज्ञविधीत मंदिरातील सभामंडप भक्त जणांनी फुलून गेलेला असतो. भाविक भक्त आपल्या इच्छा अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी करण्याच्या दृष्टीने श्रद्धापूर्वक या यज्ञकुंडात श्रीफळाच्या स्वरूपाने आहुती देतात.

मंदिरात नवरात्र महोत्सव

मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्रात नऊ दिवस भाविक उपवास ठेवतात तर काही स्त्रिया ज्यांनी नवस केला आहे त्या नऊ दिवस धरून मंदिरात बसतात. त्यांची व्यवस्था श्री रेणुकादेवी मंदिर ट्रस्टच्या वतीने केली जाते तसेच या नऊ दिवसात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यामध्ये सकाळी पाच वाजता देवीची पूजा, सहा वाजता आरती, दुपारी भजन प्रवचन व रात्री सात वाजता श्री रेणुका देवीची महाआरती झाल्यानंतर देवीभागवत पुराणाचे वाचन ह.भ.प. श्री प्रशांत महाराज पुराणिक करतात. त्यानंतर भजन कीर्तनाचा कार्यक्रम होतो.

नवरात्र उत्सवामुळे मंदिराचे

वातावरण अतिशय मंगलमय झालेले असते. भाविकात उत्साहाचे वातावरण असते. मंदिर व तेथील मुख्य रस्ते तसेच मुख्य द्वाराची विद्युत रोषणाई यात शोभा वाढवतात. याकाळात मंदिर व परिसरात चोख बंदोबस्त असतो.

यज्ञ झाल्यानंतर दसऱ्याच्या

दिवशी देवीची पालखी सिमोल्लंघनासाठी


श्री.रेणुकादेवी मंदिर संस्थान गेवराई.

मंदिरापासून शहरातील मुख्य रस्त्यावरून बीड रोड वरील मैदानात सिमोल्लंघनाचा कार्यक्रम होतो. त्या ठिकाणी (सोन्याची) आपट्याची लय लूट करून देवीच्या अंगावर टाकून दर्शन घेऊन भाविक परततात. सिमोल्लंघन कार्यक्रमात गेवराई शहर व परिसरातून अनेक लोक पायी तर कोणी वाहनाने एकत्र जमतात. मुलांचा उत्साह खूप असतो, कुणी मुद्दाम वेगवेगळ्या पेहरावात येतात, मुलांना टोप्या घालतात, त्यात उगवलेल्या धान्याचा तुरा शोभून दिसतो. तेथेच एकमेकांना सोने देऊन आपले प्रेमाचे आलिंगन एकमेकांना देतात.

अशाप्रकारे देवीच्या

जयघोषात नवरात्र उत्सवाची सांगता होते.

या दिवसांमध्ये उपेक्षित वनस्पतींना महत्त्व येथे तरवड्याची फुले, वेगवेगळ्या पानांची देवीला माळ, घरात गुगळाचा सुहास अशा प्रसन्न वातावरणात एक आगळीक असते. आता नवरात्र उत्सवाला शारदोत्सव म्हणून साजरे करतात. विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते तसेच दसरा मैदानावर आता रावण दहनाचा कार्यक्रम होतो. नगरपरिषदेच्या वतीने आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात येते. त्यामुळे भक्तांचा उत्साह द्विगुणित होत आहे. यामुळे भाविकांची गर्दी वाढत आहे. अशा प्रसन्न वातावरणात भक्तजन रेणुकामातेच्या पालखीचे दर्शन घेऊन सोने आपट्याची लूट करून घरी आनंदाने परततात. असा हा गेवराई येथील नवरात्र महोत्सव.

श्री रेणुका देवी मंदिराच्या

जीर्णोद्धाराचे काम पण मागील वर्षांपासून सुरू आहे. गेवराई व परिसरातील भक्तांनी या कामात चांगले योगदान पण केले आहे, अजून पुढील कामासाठी देवी भक्तांनी यात आर्थिक स्वरूपात योगदान करण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

आई राजा उदो उदो.......

## अंबाजोगाईच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## वाचनसंस्कृती रुजविणारे अभिजीत जोंधळे यांना राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा

# 'वाचन प्रेरणा सन्मान-२०२६' जाहीर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी अविरत धडपडणारे अंबाजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनी केंद्राचे सामाजिक कार्यकर्ते अभिजीत अरविंदराव जोंधळे यांना महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयातर्फे मानाचा 'वाचन प्रेरणा सन्मान २०२६' जाहीर झाला आहे. १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मुंबईत होणाऱ्या एका विशेष सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. या घोषणेमुळे अंबाजोगाईच्या साहित्यिक आणि सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील चर्चगेट येथे हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दैनंदिन कार्य आणि व्यवसाय सांभाळून तळागाळात वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी जोंधळे यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाची शासनाने योग्य दखल घेतली असून, मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह, सन्मानपत्र व ग्रंथभेट देऊन त्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.

वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी महत्वपूर्ण योगदान

अभिजीत जोंधळे हे अनुराग पुस्तकालयचे संचालक असून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. यामध्ये प्रामुख्याने पुस्तक वाचक चळवळ, पुस्तक पेटी योजना आणि पुस्तक कट्टा यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. ते स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय स्थानिक विकास समितीचे सदस्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (बीड केंद्र) चे कोषाध्यक्ष, 'शब्दोत्सव' दिवाळी अंकाचे संपादक आणि मैत्री ग्रुप शिष्यवृत्ती समितीचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. याशिवाय, अंबाजोगाई येथे बाल कुमार साहित्य संमेलन आणि ताई महोत्सव व्याख्यानमालेचे यशस्वी संयोजनही त्यांनी केले आहे.

आजवरच्या कार्याची राज्यभरातून दखल

महाराष्ट्रातील विविध व्याख्यानमालांमधून जोंधळे यांनी अनेक सामाजिक आणि प्रबोधनात्मक विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. त्यांच्या या निरलस कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील प्रेम छात्र पुरस्कार व ग्रंथसखा पुरस्कार, अहमदनगरचा आर्यनंदी सामाजिक सेवा पुरस्कार आणि जळगावचा दीपस्तंभ राज्यस्तरीय युवा प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. आता राज्य शासनाचा अधिकृत वाचन प्रेरणा सन्मान मिळाल्याने त्यांच्या कार्याला एक मोठी आणि प्रतिष्ठेची पावती मिळाली आहे.

## वाचन प्रेरणा दिना निमित्त दोन दिवसीय

# पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

केज/प्रतिनिधी

भारताचे माजी राष्ट्रपती,थोर शास्त्रज्ञ व महान विचारवंत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वेदशास्त्र संपन्न स्व. अमृतराव कोकिळ सार्वजनिक वाचनालय केज ता.केज,जि.बीड यांच्या वतीने गुरुवार, दि.१५ व शुक्रवार,दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसीय पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक व कवी प्रा.माणिकराव आनंदगावकर,केज यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून,प्रमुख पाहुण्या म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ.सौ.योगिनीताई थोरात (जायभाये) या उपस्थित राहणार आहेत.हे प्रदर्शन कानडी रोड,केज येथील वाचनालयाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आले असून, दोन्ही दिवशी सकाळी ९-३० ते सायंकाळी ६-०० वाजेपर्यंत नागरिकांना पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे.वाचन संस्कृतीचा प्रसार करणे,विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे,तसेच समाजातील सर्व घटकांना पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञान, विचार आणि प्रेरणा मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी ज्ञान,शिक्षण आणि वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले होते. त्यांच्या जयंती निमित्त साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन हा प्रत्येकाने वाचनाची सवय अंगीकारण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.तरी केज व परिसरातील विद्यार्थी, शिक्षक,पालक, साहित्यप्रेमी,वाचक आणि नागरिकांनी या पुस्तक प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन पुस्तकांचा लाभ घ्यावा असे आवाहन वेदशास्त्र संपन्न स्व. अमृतराव कोकिळ सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने करण्यात आले आहे.


श्री.अमृत जनार्धन कोकिळ,केज
मृत्यु रविवार दि.१३.०९.२०१५

## उद्योजक मारोतराव कवळे गुरूजी यांच्या....

# एमव्हीके साखर कारखान्याच्या चार हजार टिसीडी विस्तारीकरणाचा शुभारंभ गुरुवारी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते

मुदखेड प्रतिनिधी

उमरी तालुक्यातील एम.व्ही.के. अ‍ॅग्रो फुड प्रोडक्ट लि. कुसुमनगर-वाघलवाडा या कारखान्याच्या ४ हजार टीसीडी विस्तारीकरणाचा भव्य शुभारंभ सोहळा गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कारखानास्थळी होणार आहे.

या सोहळ्याचा शुभारंभ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खा.अशोकराव चव्हाण हे राहणार आहेत.

याप्रसंगी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मदत-पुनर्वसन मंत्री मकरंद आबा जाधव, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री अतुल सावे, साखर आयुक्त संजय कोलते, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, विशेष पोलीस महानिरीक्षक शाहजी उमाप, तसेच सर्व खासदार, आमदार व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. ऊस उत्पादक शेतकरी व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने



उपस्थित रहावे असे आवाहन चेअरमन मारोतराव कवळे गुरूजी यांनी केले आहे.

कवळे गुरुजी यांच्या कारखान्याच्या शुभारंभ प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पहिल्यांदाच उमरी तालुक्याच्या दौऱ्यावर येत असल्याने त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

# राजीव गांधी महाविद्यालयात मतदार नोंदणी व जनजागृती शिबिर

मुदखेड प्रतिनिधी :-

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तहसील कार्यालय, मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान नवीन मतदार नोंदणी व मतदार जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देणे आणि मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवकांचा मतदान प्रक्रियेतील सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण होऊन लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

शिबिरात मुदखेडचे नायब तहसीलदार संतोष कमठेकर आणि तलाठी गोपाळ माने यांनी विद्यार्थ्यांना नवीन मतदार नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीत नाव नोंदवून मतदानाच्या लोकशाही प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रकाश कोथळे, सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सतीश उमाटे, तहसील कार्यालयातील लिपिक उमेश जयस्वाल आणि संगणक परिचालक मंगेश बोरसे यांनी पुढाकार घेतला. महाविद्यालयातील कर्मचारी दिलीप डहाळे यांनी सहकार्य केले.

मतदार नोंदणीविषयी माहिती देतानाच युवकांमध्ये मतदानाच्या हक्काबाबत जाणीव निर्माण करण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरले.राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तहसील कार्यालय, मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान नवीन मतदार नोंदणी व मतदार जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.



## श्रृंगेरी देवीची आज सायंकाळची आरती पै.सतीश आबा शिंदे व सौ.नीताताई शिंदे यांच्या हस्ते

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) श्री क्षेत्र श्रृंगेरी देवस्थान, ब्रह्मगाव येथे आज बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी श्रृंगेरी देवीची आरती राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष पै. सतीश आबा शिंदे व माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. नीताताई सतीश शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. श्री क्षेत्र श्रृंगेरी देवी देवस्थान हे भाविकांच्या श्रद्धेचे स्थान असून, येथे विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भक्तिभाव आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळते.

देवीच्या सायंकाळच्या आरतीनिमित्त भाविकांना दर्शन घेऊन आरतीमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या आरती सोहळ्याची माहिती श्री क्षेत्र श्रृंगेरी देवस्थान ट्रस्ट व ब्रह्मगाव येथील ग्रामस्थांनी दिली आहे. या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून श्रृंगेरी देवीच्या आरतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कवयित्री शांता शेळके यांचे साहित्य स्त्रियांच्या भावना व संघर्षाचे प्रतिबिंब-डॉ.आशा फड

प्रतिभा संपन्न लेखणीला लेखिकेकडून अभिवादन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कवयित्री शांता शेळकेंचे साहित्य हे स्त्री विश्वाचा अविष्कार आहे; प्रख्यात मराठी कवयित्री, गीतकार, लेखिका म्हणून शब्दरचना करताना त्यांच्या लेखणीत स्त्रियांच्या भावना संघर्ष आणि संवेदनेचे प्रतिबिंब आहे!असे मत भाषा साहित्यिक लेखिका डॉ. आशा फड यांनी व्यक्त केले.

सोमवारी दिनांक १२ ऑक्टोबर रोजी प्रख्यात साहित्यिक कवयित्री शांता शेळके यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मौलिक साहित्य संपदेला विनम्र अभिवादन केल्यानंतर डॉ. आशा फड बोलत होत्या. डॉ. फड पुढे म्हणाल्या, शांत शेळके यांचे तोच चंद्रमा, कळ्यांचे दिवस, फुलांच्या राती आदी सह विविध मराठी गीते गाजली. गुलमोहर, कावेरी, बासरी या कथासग्रहातून त्यांनी मौलिक योगदान दिले.स्त्री संवेदना प्रधान साहित्याची निर्मिती त्यांनी केली. स्त्रियांच्या प्रेमाचे, विवाहाचे व एकाकीपणाचे आणि तिच्या हळव्या विश्वाचे अतिशय कोमल आणि वास्तववादी चित्र त्यांच्या साहित्यातून आढळते. त्यांचे हे विविधांगी साहित्य स्त्री साहित्यिकांना सदैव दिशादर्शक



ठरतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी समता जोगेश्वरी शिक्षण मंडळासह विविध संस्था, संघटना आणि साहित्य प्रेमीं कडून कवयित्री शांता शेळके यांना अभिवादन करण्यात आले.

# रोज एक तास श्रमदान या उपक्रमांतर्गत माजी आ.साहेबराव दरेकर नाना यांचे श्रमदान

स्वच्छ परिसर,निरोगी समाज चा संदेश

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) स्वच्छ परिसर, निरोगी समाज आणि आरोग्यदायी जीवनाचा संदेश देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, आष्टी येथे 'रोज एक तास श्रमदान' या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात माजी आ. साहेबराव दरेकर नाना यांनी उपस्थित राहून श्रमदान केले. रुग्णालय परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

रुग्णालय हे रुग्णांना उपचार आणि आरोग्यसेवा देणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे रुग्णालयाचा परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यपूरक असणे अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छ



परिसरामुळे रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील कर्मचारी यांना चांगले वातावरण मिळण्यास मदत होते. याच उद्देशाने ग्रामीण रुग्णालय, आष्टी येथे श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात माजी आ. साहेबराव दरेकर नाना यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन श्रमदान केले. त्यांच्या सहभागातून स्वच्छतेच्या कार्यात प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान देण्याची गरज अधोरेखित झाली.

केवळ शासकीय यंत्रणेवर स्वच्छतेची जबाबदारी न टाकता नागरिकांनीही सामाजिक बांधिलकी जपत सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणे, रुग्णालये, शाळा आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण होऊन नागरिकांमध्ये श्रमदानाची भावना रुजावी, यासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे. 'रोज एक तास श्रमदान' या संकल्पनेतून प्रत्येकाने आपल्या परिसराच्या स्वच्छतेसाठी दररोज थोडा वेळ दिल्यास स्वच्छ आणि सुंदर समाजनिर्मितीला हातभार लागू शकतो. ग्रामीण रुग्णालय, आष्टी येथे राबविण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानातून स्वच्छतेसोबतच सामाजिक उत्तरदायित्व आणि लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित झाले.



## एकलव्य विद्यालयात कायदेविषयक शिबिर संपन्न

## तालुका विधी सेवा समितीचा उपक्रम

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर शहरातील एकलव्य विद्यालयात तालुका विधी सेवा समितीच्या वतीने कायदेविषयक शिबिर मंगळवारी संपन्न झाले.या शिबीरामध्ये महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या पत्रातील निर्देशाप्रमाणे सदर कार्यक्रमात खालील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.हुंडयाची सामाजिक दुष्प्रवृत्ती,लिंग समानता,महिलांचे हक्क तसेच सामुदायीक किमान कार्यक्रम माहे सप्टेंबर २०२६ या महिन्यातील विषय शाळा आणि महाविद्यालयांमध्ये बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा २०१२ व समाजात महिलांची सुरक्षा या बाबत विशेष जनजागृती करून मार्गदर्शन करण्यात आले.या वेळी तालुका विधी सेवा समितीचे अधिकार मित्र तथा पत्रकार गोकुळ पवार,रोहन जोगदंड,एकलव्य विद्यालयाचे प्राचार्य निलेश पोकळे यांच्यासह विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बीड जिल्ह्यात चारा छावण्या सुरु करण्याची गरज; पशुधन वाचविण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा

## दुष्काळाच्या झळांनी ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात; शेतकरी, पशुपालक आणि छोटे व्यावसायिक आर्थिक अडचणीत

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी आणि चाऱ्याच्या संभाव्य टंचाईमुळे पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर बनत असून, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था कशी करावी, असा प्रश्न पशुपालकांना सतावत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जिल्ह्यातील परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक त्या ठिकाणी पशुधनासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती आणि पशुपालनावर अवलंबून आहे. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसताना जनावरांच्या चाऱ्यासाठी आणि पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. दूध उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती असून, पशुधन सांभाळणे दिवसेंदिवस खर्चिक ठरत आहे. अशा परिस्थितीत शासनाने वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर शेतकरी आणि पशुपालकांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर

दुष्काळी परिस्थितीत हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी होणे, पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि जनावरांच्या देखभालीचा खर्च वाढणे, अशा अनेक समस्यांना पशुपालकांना सामोरे जावे लागू शकते. जनावरे ही ग्रामीण कुटुंबांची मोठी आर्थिक संपत्ती असून, त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. मात्र, आर्थिक परिस्थिती कमकुवत झाल्यामुळे अनेक पशुपालकांसाठी जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करून देणे आव्हानात्मक बनत आहे.त्यामुळे शासनाने गावनिहाय परिस्थितीची पाहणी करून चारा आणि पाण्याची उपलब्धता तपासावी. ज्या भागांत चाऱ्याची टंचाई गंभीर आहे, तेथे तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात. तसेच छावण्यांमध्ये जनावरांसाठी पुरेसा चारा, स्वच्छ पाणी, निवारा आणि आवश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळाचा फटका; ग्रामीण भागातील व्यवसाय ठप्प

दुष्काळाचा परिणाम केवळ शेती आणि पशुपालनापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर उमटतात. शेतीतून मिळणारे उत्पन्न घटल्यास ग्रामीण भागातील बाजारपेठांमधील उलाढाल कमी होते. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने किरकोळ दुकानदार, कृषी सेवा केंद्रे, मजूर, वाहतूक व्यावसायिक आणि इतर लहान-मोठ्या व्यवसायांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांची आर्थिक घडी विस्कळीत झाल्याने दैनंदिन खर्च भागविणेही कठीण होऊ शकते. रोजगाराच्या संधी कमी होणे, मजुरीची कामे घटणे आणि बाजारपेठेतील व्यवहार मंदावणे यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक चक्रावर परिणाम होतो. त्यामुळे दुष्काळाचा प्रश्न हा केवळ पाणी किंवा चारा उपलब्ध करून देण्यापुरता मर्यादित नसून, तो ग्रामीण जनजीवन आणि रोजगाराशीही संबंधित आहे.

बीड जिल्ह्यातील परिस्थिती लक्षात घेता राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. चारा छावण्या सुरू करण्यासाठी आवश्यक निकषांनुसार सर्वेक्षण करणे, चारा उपलब्धतेचे नियोजन करणे आणि गरजू पशुपालकांपर्यंत मदत पोहोचविणे महत्त्वाचे ठरणार आहे.यासोबतच टंचाईग्रस्त भागांत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जनावरांसाठी पाण्याचे टँकर, चारा डेपो आणि पशुवैद्यकीय तपासणी शिबिरांसारख्या उपाययोजनांचाही विचार करणे आवश्यक आहे. परिस्थिती गंभीर असलेल्या गावांना प्राधान्य देऊन मदतकार्य राबविल्यास पशुधनाचे नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते.

निर्णयाला विलंब नको; पशुधन वाचविणे महत्त्वाचे

दुष्काळाच्या संकटात शेतकरी आणि पशुपालकांना दिलासा देण्यासाठी शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष उपाययोजना करणे आवश्यक आहे. चारा छावण्या सुरू करण्याबाबत परिस्थितीनुसार तातडीने निर्णय घेतल्यास पशुपालकांना मोठा आधार मिळू शकतो. तसेच ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार पूर्वपदावर आणण्यासाठी रोजगारनिर्मिती आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांनाही गती देणे गरजेचे आहे.बीड जिल्ह्यातील पशुधनाचे संरक्षण, शेतकऱ्यांना दिलासा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या ठिकाणी चारा छावण्या सुरू कराव्यात, हीच सध्याची प्रमुख गरज आहे.

# प्राचार्य डॉ पांडुरंग कडू पाटील स्टार एज्युकेशन अवॉर्ड २०२६ ने सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ. पांडुरंग कडू पाटील यांना एजुकेशन सप्लाय अँड फ्रँचाइजी व टाइम्स ऑफ इंडिया यांच्या सयुंक्त विद्यमाने स्टार




एज्युकेशन अवॉर्ड २०२६' ने सन्मानित करण्यात आले.मुंबई येथे दि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी या पुरस्काराचे वितरण विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले . हा पुरस्कार बेस्ट प्रिन्सिपल इन स्कूल ऑफ सीबीएसई बोर्ड जिल्हा बीड यासाठी देण्यात आला. प्राचार्य कडू पाटील यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, निर्देशक संकेत मोदी, व्यवस्थापकीय निर्देशक श्रीमती डिंपल संकेत मोदी , तसेच प्रा वसंत चव्हाण यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून त्यांना त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे प्राचार्य डॉ पांडुरंग कडू पाटील यांना या पुरस्काराच्या अगोदर शिक्षण क्षेत्रातील उत्तम योगदानसाठी एस. आर. जे. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, कलबुर्गी (गुलबर्गा ) कर्नाटक यांच्याकडून शिक्षकदिनाच्या निमित्ताने प्रज्ञाअमृत २०२६ हा अत्यंत प्रतिष्ठेचा असा पुरस्कार ६ सप्टेंबर २०२६ रोजी बहाल करण्यात आला आहे. यासोबतच त्यांना आयडियल प्रिंसिपल अवॉर्ड, अक्टिव्ह प्रिंसिपल अवॉर्ड यासह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थापक राजकिशोर मोदी यांच्यासह प्राचार्य डॉ बी आय खडकभावी, प्रा डॉ बिराजदार यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक तथा क्रीडा क्षेत्रातून कौतुक केल्या जात आहे.